




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. १२ नोव्हेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : 00३ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# रस्ते सुरक्षा वाऱ्यावर, झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे पुसट

## बेशिस्त वाहनचालकांमुळे रस्ते ओलांडणे धोक्याचे



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी ठाणे पालिकेने विविध चौकात झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे तयार केले आहेत. तसेच सुशोभिकरणासाठी रस्त्यांवर काही ठिकाणी अडथळे देखील उभे केले आहेत. मात्र, शहरातील मुख्य रस्ते तसेच अंतर्गत रस्त्यांवरील झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे हे काही वर्षातच पुसट झालेत. यामुळे वाहचालकांकडून झेब्रा क्रॉसिंगच्या पट्ट्यावरच वाहने उभी केली जात आहेत. तसेच काही ठिकाणी गतिरोधकांवरच खड्डे पडल्याचे दिसत आहे. त्यामुळे शहरातील रस्ते ओलांडणे नागरिकांसाठी धोक्याचे ठरत आहेत.

पादचाऱ्यांना सुरक्षितपणे रस्ता ओलंडता यावा यासाठी ठाणे महापालिकेच्यावतीने शहरातील विविध चौकांमध्ये झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे आखले होते. तसेच सुशोभीकरणाच्या उद्देशाने काही ठिकाणी आकर्षक रंगकाम, लोखंडी अडथळे देखील केले होते. शहरात रस्त्यांवरील झेब्रा क्रॉसिंगचा रंग काही वर्षापूर्वी बदलण्यात आला होता. तेव्हा लाल आणि पांढऱ्या रंगांचे पट्टे आखले होते. मात्र, या सर्व उपक्रमांची अवस्था बिकट झाली आहे. शहरातील मुख्य रस्ते तसेच अंतर्गत मार्गांवरील झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे आता पूर्णपणे पुसट झाल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी रस्त्यावरील पट्टेच गायब झाले आहेत. या परिस्थितीमुळे वाहन चालक झेब्रा क्रॉसिंगच्या रेषेवरच वाहने उभी करत आहेत. या अशा प्रकारामुळे सिग्नल यंत्रणा बंद असताना पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी जागा मिळत नसल्याने त्यांना जीव मुठीत घेऊन मार्ग काढावा लागत आहे.

परिणामी अपघातांचा धोका वाढल्याचे दिसत आहे. दरम्यान, अनेक रस्त्यांवरील गतिरोधकांची स्थिती देखील चिंताजनक आहे. वसंत विहार, हिरानंदानी इस्टेट अशा परिसरात गतिरोधकांची अशी अवस्था आहे.

## विमानतळासाठीचे क्षेत्र निश्चितीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे



पुणे : पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठीचे भूसंपादनाचे क्षेत्र निश्चित कररण्यासंदर्भातील प्रस्ताव मान्यतेसाठी जिल्हा प्रशासनाकडून मंगळवारी राज्य शासनाकडे पाठविण्यात आला. त्यामध्ये विमानतळासाठी किती क्षेत्र आवश्यक असून जमीन मोजणीची माहिती देण्यात आली आहे.

## आता बोला...




# बिबट्याचे हल्ले रोखण्यासाठी आता 'एआय' प्रणाली, ड्रोन सर्वेक्षण करू बिबट्यांची संख्येची नोंद

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यात मानव-बिबट संघर्ष दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे बिबट्यांचे हल्ले रोखण्याच्या दृष्टीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येणार असून अतिसंवेदनशील भागात 'कृत्रिम बुद्धिमत्ता'(एआय) प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच ड्रोन सर्वेक्षण करून बिबट्यांची संख्या नोंदविण्या येणार आहेत. दरम्यान, शिरूर आणि आंबेगाव तालुक्यात आत्तापर्यंत १७ बिबट पकडण्यात आले असून हे सर्व बिबटे जुन्नर येथील 'माणिकडोह बिबट निवारण केंद्रात' ठेवण्यात आले आहेत. तसेच बिबट हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर



जिल्हास्तरावर नियंत्रण कक्षाचीही स्थापना करण्यात आली आहे. मानव-बिबट संघर्षाच्या पार्श्वभूमीवर उपायोजना करण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी बैठक झाली. त्यामध्ये काही उपाययोजना करण्याचे निश्चित करण्यात आले. जुन्नर विभागाचे उपवनसंरक्षक प्रशांत खाडे, पुणे विभागाचे उपवनसंरक्षक महादेव मोहिते, प्रादेशिक आणि वन्यजीव विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी यावेळी उपस्थित होते. या बैठकीत जिल्ह्यातील बिबट प्रवण क्षेत्रातील घटनांचा आढावा घेण्यात आला.

अतिसंवेदनशील गावांमध्ये एआय प्रणाली, सोलार नाईट सर्व्हिलन्स ड्रोन, कॅमेरा ट्रॅप्स, साऊंड अलर्ट सिस्टिम अशा यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीमध्ये जुन्नर वनविभागाकडे २६२ पिंजरे उपलब्ध असून उर्वरीत पिंजरे तयार करण्याचे कामे सुरू आहे. तसेच अन्य आवश्यक साहित्य खरेदीची कार्यवाहीही सुरू करण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. 'अन्य जिल्ह्यातून किंवा राज्यातून तातडीने ७०० पिंजरे उपलब्ध करण्यात येणार आहे. त्यासाठी पिंजरे तातडीने उपलब्ध करून देऊ शकणारे पुरवठादार, संस्था किंवा कंपन्यांशी संपर्क साधण्यात येणार आहे.

### दीड हजार क्षमतेचे नवे बिबट निवास केंद्र

सद्य:स्थितीमध्ये माणिकडोह बिबट निवारण केंद्रात ५० बिबट ठेवण्याची क्षमता असून सध्या तेथे ६७ बिबटे आहेत. जिल्ह्यातील बिबट्यांच्या संख्येत वाढ होत असल्याने जुन्नर वनविभागाल एक हजार बिबट आणि पुणे वनविभागाला ५०० बिबट समावतील अशा विविध ठिकाणी नवीन बिबट निवास केंद्र उभारण्याची सूचनाही जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केली.

# अजित पवारांना मोदीही वाचवू शकणार नाहीत

## बावनकुळेंच्या भेटीनंतर अंजली दमानियांचा दावा



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

"उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आता पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही वाचवू शकणार नाहीत", असं वक्तव्य सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केलं आहे. पार्थ पवार यांच्या पुण्यातील जमीन व्यवहार प्रकरणानंतर दमानिया यांनी ही टिप्पणी केली आहे. दमानिया म्हणाल्या, "मी सिंचन घोटाळा, महाराष्ट्र सहकारी बँक घोटाळा बाहेर काढणार आहे. अजित पवारांच्या आजवरच्या घोटाळ्यांविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार आहे."

पार्थ पवार यांच्या जमीन व्यवहाराप्रकरणी दमानिया यांनी मुंबईत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. मेघदूत बंगल्यावर दमानिया व बावनकुळे यांच्यात बराच वेळ चर्चा झाली. या भेटीनंतर दमानिया यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्यांनी अजित पवारांना इशारा दिला आहे.

अंजली दमानिया म्हणाल्या, "मी उच्च न्यायालयात दाद मागणार आहे. महाराष्ट्रातील सिंचन घोटाळा, महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळा, जरंडेश्वर साखर कारखान्याशी संबंधित घोटाळ्याच्या फाईल्स हळूहळू बाहेर काढणार आहे.

मी यावेळी ठरवलं आहे की मी उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार आहे. अजित पवार यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिंचन घोटाळ्यातून वाचवलं. मात्र, यावेळी त्यांना कोणीही वाचवू शकणार नाही.

"मी जे घोटाळे बाहेर काढणार आहे, जे पुरावे सादर करणार आहे, ते केल्यानंतर आता अजित पवार पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा आणखी कोणाकडेही गेले तरी त्यांना कोणी वाचवू शकणार नाही. मी याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशांद्वारे कारवाई होईल याची काळजी घेणार आहे. एकाही खटल्यामधून त्यांना बाहेर येऊ देणार नाही."


# बांधकाम व्यवसायिकांची लाखोंची स्टील चोरी, सहा जणांना अटक

**वसई : (समर्थ गांवकरी)**

बांधकाम व्यवसायीकांचे स्टील चोरी करणाऱ्या टोळीचा गुन्हे प्रकटीकरण कक्ष २ च्या पथकाने पर्दाफाश केला आहे. वसई पूर्व येथील मोकळ्या मैदानातून सहा आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून ४० लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वसई पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथील मोकळ्या मैदानात मंगळवारी स्टील ने भरलेला ट्रेलर उभा होता. याच ट्रेलर मध्ये असलेले स्टील चोरी करून एका टेम्पो मध्ये भरून नेत होते. याची गुप्त माहिती गुन्हे प्रकटीकरण कक्ष २ च्या पथकाला मिळाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ छापा टाकून कारवाई केली. यात अच्छेलाल जगमोहन मौर्या (५५), राकेश रामजित उपाध्याय(३४), दिनदयाळ लालबहादुर पांडे (३९), यानुर अफसरअली शेख (२१) शुभम राजेश सिंग जावेद साहिद शेख (२६) अशा सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे.

# महायुतीने शक्यतो एकत्र निवडणुका लढवाव्यात : मुख्यमंत्री

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रदेश भाजपकडून माजी प्रदेशाध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवडणूक व्यवस्थापन व प्रचार प्रमुखपदाची धुरा देण्यात आली आहे. स्थानिक पातळीवर जास्तीत जास्त ठिकाणी महायुतीने एकत्र निवडणुका लढविण्याबाबत शक्यतो निर्णय घेण्यात यावा, यावर जिल्हा प्रभारींनी भर द्यावा आणि मित्रपक्षांवर टीका-टिप्पणी न करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पक्षाच्या नेत्यांना दिले. फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली भाजपच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या जिल्हा प्रभारींची बैठक झाली. या बैठकीस पक्षाचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, राज्यातील विविध भागातील संघटन मंत्री, सरचिटणीस, राज्य सरकारमधील भाजपचे मंत्री उपस्थित होते. या बैठकीत निवडणूक व्यवस्थापन व प्रचारप्रमुख पदाची जबाबदारी बावनकुळे यांच्याकडे देण्याचा निर्णय घेण्यात आला. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या वेळी बावनकुळे हे प्रदेशाध्यक्ष होते. त्यांनी आपल्या प्रदेशाध्यक्षपदाच्या कारकीर्दीत राज्यभरात बराच प्रवास केला होता आणि संघटनेच्या बांधणीवर भर दिला होता. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी बावनकुळे यांची निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्तीची घोषणा केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप आणि महायुती ५१ टक्के मते घेवून व दोन-तृतीयांश बहुमताने मोठे यश मिळवेल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.

# गोविंदाची प्रकृती बिघडली, रुग्णालयात उपचार सुरू

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

बॉलीवूड अभिनेता गोविंदाची प्रकृती अचानक बिघडल्याने मंगळवारी रात्री त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अभिनेत्याला अचानक चक्कर आली आणि तो राहत्या घरी बेशुद्ध पडला.



यानंतर त्वरीत डॉक्टरांशी संपर्क साधून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. "त्याला प्रचंड अस्वस्थ वाटत होतं. आम्ही रात्री १ वाजता त्याला रुग्णालयात घेऊन आलो. आता डॉक्टरांनी त्याच्या सगळ्या चाचण्या केल्या आहेत. त्याचे न्यूरोलॉजिकल कन्सल्टेशन रिपोर्ट्स आल्यावर आम्हाला पुढची माहिती मिळेल." असं त्याचे कायदेशीर सल्लागार व जवळचे मित्र ललित बिंदल यांनी इंडिया टुडेला सांगितलं. गोविंदाला जुहू येथील क्रिटिकल केअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं आहे. अभिनेत्याच्या प्रकृतीवर डॉक्टरांची टीम लक्ष ठेवून आहे तसेच आवश्यक चाचण्या सुद्धा करण्यात येत आहेत. "गोविंदाला थोडं चक्कर आल्यासारखं वाटलं त्यानंतर त्याचं डोकं जड झालं म्हणून आम्ही त्याला न्यूरोलॉजिस्टकडे तपासणीसाठी घेऊन आलो. सरांना आता बरे वाटत आहे, ते विश्रांती घेत आहेत काळजी करण्यासारखं काही नाही. आम्हाला फक्त त्याला चक्कर का येतेय हे जाणून घ्यायचं होतं. न्यूरोलॉजीच्या डॉक्टरांनीच त्याला रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला होता. आता सरांची मुलगी टीना त्यांच्याबरोबर आहे." अशी माहिती गोविंदाच्या मॅनेजरने दिली आहे.

# ४९२ प्रकरणांत ११४ कोटींची मुद्रांक चोरी!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यात लाखो दस्तावेज मुद्रांक शुल्काविना वापरात असल्याची भीती खरी ठरली असून मीरा भाईंदर महानगरपालिकेतील विकास हक्क हस्तांतरणाच्या (डीआरसी) ४९२ प्रकरणांत मुद्रांक वसुलीची कारवाई ठाणे मुंद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाने सुरु केली आहे. या प्रकरणांत ११४ कोटींची मुद्रांक चोरी झाल्याचा अंदाज असून दंडासह ही रक्कम ५५९ कोटींच्या घरात गेली आहे. काही दस्तावेजांची नोंदणी आवश्यक नसली तरी मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक असते. याबाबत 'लोकसत्ता'ने प्रकाशझोत टाकल्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकांना अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. हा अहवाल प्राप्त झाला असून त्यानुसार मीरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ६४२ प्रकरणांपैकी ९३ प्रकरणांत मुद्रांक शुल्क भरल्याचे आढळून आले तर ५७ प्रकरणांत चार कोटी १८ लाख रुपयांची वसुली करण्यात आली. ४९२ प्रकरणांत महाराष्ट्र मुद्रांक अधिनियममधील ३३ कलमान्वये वसुलीची नोटिस जारी करण्यात आली आहे. हा घोटाळा अमोल राकवी, अजय धोका आणि विकास पाटील या नागरिकांनी उघड केला. मीरा भाईंदर महापालिकेवर त्यांनी प्रामुख्याने लक्ष केंद्रीत केले असून विकास हक्क हस्तांतरण प्रमाणपत्रांवर (डीआरसी) मुद्रांक शुल्क भरला नसल्याचे त्यांना




अनेक प्रकरणांत आढळले. याबाबत ठाणे जिल्हा सहनिबंधक कार्यालयाने नोटिसाही जारी केल्या. परंतु वसुलीची कारवाई केली नाही. त्यानंतर 'अभय योजना' जारी झाली आणि वसुलीला वेग आला. याबाबत पाठपुरावा झाला नसता तर मुद्रांक शुल्क व दंडाची वसुली झालीच नसती, याकडे राकवी यांनी लक्ष वेधले. नोटरी करुन अशी प्रमाणपत्रे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्वीकारली. वास्तविक त्यांनी मुंद्रांक जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविणे आवश्यक होते. त्यामुळेच हा घोटाळा होऊ शकला, असेही राकवी यांनी सांगितले. या अनियमिततेची दखल पहिल्यांदा तत्कालीन नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक श्रावण हर्डीकर यांनी घेतली. ८ डिसेंबर २०२१ रोजी राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या आयुक्तांना, जिल्हाधिकाऱ्यांना तसेच मुख्य अधिकाऱ्यांना पत्र लिहून अशा दस्तावेजांवर मुद्रांक शुल्क भरले जाईल तसेच आवश्यकता असल्यास नोंदणी झाल्याबाबत दक्षता बाळगण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर महसूल विभागाचे तत्कालीन अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार यांनीही २८ जून २०२४ मध्ये पुन्हा परिपत्रक जारी केले. परंतु फक्त परिपत्रक जारी करण्यापलीकडे राज्य शासनाची वसुलीची इच्छा नसल्याचे आढळून आले आहे.

### 'अभय योजने'चा उतारा!

नोंदणी आवश्यक नसलेल्या दस्तावेजांवर मुद्रांक शुल्क बंधनकारक असतानाही ते न भरल्यामुळे राज्य शासनाच्या मुद्रांक शुल्कामुळे मिळणाऱ्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हे बुडीत मुद्रांक शुल्क दामदुपटीने वसूल करण्याऐवजी 'अभय योजना' आणून महसूलावर पाणी सोडले जात आहे. १९९६ पासून आतापर्यंत पाच-सहा वेळा अभय योजना जारी करण्यात आली आहे. त्यामुळे मुद्रांक शुल्क चोरी करणाऱ्यांनी मूळ रक्कम भरुन त्यावरील दंडापोटी फक्त दहा टक्के रक्कम भरली आहे. अभय योजनेमुळेच मुद्रांक शुल्क चोरी करणाऱ्यांची संख्या वाढत आहे, असा आरोप राकवी यांनी केला.

# वाघांचा पाळणा हलणार का?

सातार्‍याच्या घाटमाथ्यावर, सावंतवाडीच्या दर्‍यांमध्ये आणि कोकणाच्या डोंगरमाथ्यांत पसरलेल्या घनदाट अरण्याच्या कुशीत महाराष्ट्राने आपला तिसरा व्याघ्र प्रकल्प म्हणून सह्याद्रीची निवड केली. या प्रकल्पाची कहाणी सुरुवातीपासूनच शोध आणि संघर्षाची राहिली आहे. वाघांना सुरक्षित अधिवास देण्यासाठी २०१० मध्ये हा प्रकल्प घोषित झाला खरा, पण २०२२च्या गणनेत सह्याद्रीत एकही वाघ नसल्याचे आढळले. या निष्कर्षाने वनविभागाला आत्मपरीक्षण करायला भाग पाडले आणि सुरू झाली वाघांच्या पुनर्वसनाची नवी मोहीम. सध्या या प्रकल्पात तीन वाघांची नोंद आहे. सह्याद्रीमध्ये २०१८ साली पहिल्या वाघाचे दर्शन झाले. पुढे २०२३ला दुसरा आणि २८ ऑक्टोबर २०२४ रोजी तिसर्‍या वाघाचे दर्शन झाले. या वाघांचा संसार फुलविण्यासाठी पहिल्या टप्प्यात पेंच आणि ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातून दोन वाघिणी सह्याद्रीमध्ये सोडण्यात येणार आहेत. हा संपूर्ण उपक्रम फक्त वाघ संरक्षणापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण जैवविविधता व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. सह्याद्रीमध्ये सध्या असलेले तीन नर वाघ स्वत: स्थलांतरित झाले आहेत. आता जो प्रयोग केला जात आहे त्यात वनविभागाकडून हे स्थलांतरण केले जाणार आहे. हा फरक इथे लक्षात घ्यायला हवा.



## संपादकीय

जगभरात वाघांचे संरक्षण व पुनर्वसनासाठी स्थलांतरणाची अनेक उदाहरणे आहेत. रशिया, इंडोनेशिया, मलेशिया, चीन या देशांतही वाघाचे स्थलांतरण झाले आहे. अमेरिकेत आणि थायलंडमध्ये कृत्रिम अधिवासाची अडचण आणि नर-मादी संख्येचे व्यवस्थापन करण्यात चूक झाल्याने अनेक प्रयोग अपयशी ठरले. भारतात वाघ स्थलांतरणाचा इतिहास संमिश्र आहे. राजस्थानच्या सरिस्का व्याघ्र प्रकल्पात वाघांचे स्थलांतर यशस्वी झाले आहे. हे भारतातील पहिले यशस्वी वाघ स्थलांतर मानले जाते. पन्ना व्याघ्र प्रकल्पात २००९ मध्ये शेवटच्या वाघाचे नामोनिशाण मिटले. त्यामुळे बांधवगड, कान्हा आणि पेंचमधून वाघ आणून पन्नाला वाघांचे अस्तित्व बहाल करण्यात आले. सह्याद्रीमध्ये होऊ घातलेल्या प्रकल्पासाठी ही उदाहरणे आदर्श ठरू शकतात. मात्र, सावधगिरी न राखल्याने वाघाचे स्थलांतर अयशस्वी झाल्याची उदाहरणेही आहेत. २०१८ मध्ये मध्यप्रदेशमधून ओडिशातील सातकोसिया टायगर रिझर्व्हमध्ये दोन वाघ स्थलांतरित केले गेले. मात्र, स्थानिक गावकर्‍यांनी याला विरोध केला. मोठे आंदोलन झाले. वाघ मृतावस्थेत आढळला. त्याला मारल्याचा संशय व्यक्त केला गेला. दुसर्‍या वाघिणीने काही लोकांवर हल्ला केला. त्यामुळे स्थलांतरणाचा हा प्रयोग येथे थांबवावा लागला. मध्य प्रदेशातील बांधवगडमध्येही असेच घडले. या उदाहरणांमधून महाराष्ट्राच्या वनविभागाने काय धडा घेतला हे फार महत्त्वाचे आहे. ताडोबा आणि सह्याद्रीच्या जंगलातले वातावरण, जैवविविधता आणि भूगोल एकमेकांपेक्षा खूप वेगळे आहेत. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प हे दक्षिण उष्णकटिबंधीय कोरड्या पानगळीचे दाट जंगल आहे. येथे सागवान, बांबू, गवताळ कुरणे असा मिश्रित अधिवास आढळतो. प्रचंड जैवविविधता, शाकाहारी प्राण्यांची मोठी संख्या आणि वाघांसाठी पुरेशा भक्ष्याचा साठा हे हवे असणारे घटक येथे आहेत. सह्याद्रीचा पट्टा पावसाळी, दाट जंगल, घनदाट जमीन आणि कठीण डोंगराळ भूभाग या स्वरूपाचा आहे. येथे मातीची मोठ्या प्रमाणात धूप, जंगलतोड, आणि वाढता मानवी हस्तक्षेप यामुळे जैवविविधतेवर मोठ्या प्रमाणात प्रतिकूल परिणाम झाला आहे. नद्या, मोठ्या उतार, आणि वेगळ्या वनस्पतींचा दबदबा आहे. वाघांसाठी भक्ष्यसंख्या कमी, वावरण्यास अपुरी जागा आणि मानवी वस्तीचा धोका ही मोठी आव्हाने सह्याद्रीत आहेत. हा विचार करतानाच जंगल बदलामुळे शारीरिक, वर्तनात्मक आणि पर्यावरणीय परिणाम होतो.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ३४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | 1 | | | 7 | | | 8 |
| 6 | | 8 | | 3 | 2 | | 9 | |
| | | | | 8 | 4 | | | |
| 7 | | | | | 5 | | 6 | 2 |
| | 1 | 3 | | 9 | | 4 | 8 | |
| 4 | 6 | | 2 | | | | | 9 |
| | | | 4 | 2 | | | | |
| | 7 | | 6 | 5 | | 9 | | 4 |
| 3 | | | 8 | | | 2 | | 6 |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ३३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | 1 | 2 | 5 | 7 | 6 | 4 | 9 |
| 9 | 4 | 2 | 6 | 1 | 8 | 3 | 7 | 5 |
| 5 | 7 | 6 | 9 | 3 | 4 | 1 | 2 | 8 |
| 7 | 1 | 5 | 8 | 4 | 6 | 9 | 3 | 2 |
| 4 | 2 | 9 | 3 | 7 | 5 | 8 | 1 | 6 |
| 6 | 8 | 3 | 1 | 2 | 9 | 7 | 5 | 4 |
| 2 | 6 | 4 | 7 | 9 | 1 | 5 | 8 | 3 |
| 1 | 5 | 8 | 4 | 6 | 3 | 2 | 9 | 7 |
| 3 | 9 | 7 | 5 | 8 | 2 | 4 | 6 | 1 |

**पंचांग**
१२ नोव्हेंबर २०२५
बुधवार
विक्रम संवत्- २०८२
कार्तिक शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- कार्तिक
ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:अष्टमी २२:५८:४२

नक्षत्र:ओषा १८:३५:१४
योग:शुक्ल ०८:०२:०५
करण:बालव १०:५७:५५
करण:कौलव २२:५८:४२
सूर्य:तुला
चन्द्र:सिंह१८:३५:१४

## उपदेशाचे डोस

### शक्तीवर युक्तीने मात

राजधानीचं शहर, दुथडी भरून वाहणारी नदी. विस्तीर्ण नदीकाठ. तिथं एका मोठ्या झाडावर एक कावळा-कावळी राहत होती. अंडी झाडाच्या ढोलीत ठेवून दोघं अन्न मिळविण्यासाठी बाहेर जात. ते परत येईपर्यंत त्यांची अंडी नाहीशी होत. दोन-तीन वेळा असं झाल्यावर एकदा त्या दोघांनी लपून बसून लक्ष ठेवले तर झाडाखालील एका बिळातून एक साप येऊन ती अंडी पळवत असलेला त्यांना दिसला. त्या मोठ्या सापापुढे या दोघांचा कसा निभाव लागणार? त्यांनी ही हकीगत त्यांचा मित्र असलेल्या कोल्ह्याला सांगितली. कोल्ह्याने त्यांना एक युक्ती सांगितली. दुसर्‍या दिवशी राजकन्या नदीवर आंघोळ करण्यासाठी लवाजम्यासह आली. तिचे दागिने दासींनी काठावर काढून ठेवले. कावळ्याने त्यातील एक हार उचलला आणि तो त्याने सापाच्या बिळात नेऊन टाकला. दासींनी ते पाहिल्यावर आरडाओरडा केला. सैनिक धावत आले. त्यांनी ते बिळ खणून काढले तेव्हा त्यांना मोठा साप दिसला. त्यांनी त्या सापाला ठार मारले व तो हार ते घेऊन गेले. कावळा-कावळी हे पाहून आता निश्चिंत झाले.

कथा उपदेश : शक्तीवर युक्तीने मात करा.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९४२ - ग्वाडालकॅनालजवळ पहिले नाविक युद्ध सुरू.
- १९४४ - ब्रिटिश विमानांनी ५५०० किलो (१२ हजार पॉंड) वजनाचा बॉम्ब टाकून टिर्पिझ ही जर्मन युद्धनौका बुडवली. ही घटना दुसर्‍या महायुद्धात गाजली.

### राष्ट्रीय

- १९३० - पहिली गोलमेज परिषद सुरू.
- १९५२ - युनेस्कोच्या अध्यक्षपदी सर्वपल्ली राधाकृष्णन यांची निवड.
- १९६९ - कॉंग्रेस अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी इंदिरा गांधी यांना पक्षातून हाकलले.
- २००७ - मोबाईल सेवा देणारी कंपनी कुठलीही असो, आपल्या मोबाईलचा नंबर तोच राहाणार असल्याचा निर्णय ट्रायने दिला.


### जन्म

- १८४० - ऑगस्ते रोदॅं, कलाकार.
- १८४२ - जॉन रॅले, १ अरगॉन या निष्क्रिय वायूचे संशोधक.
- १८७९ - सर सी.पी. रामस्वामी अय्यर, विद्वान भारतीय.
- १८८० - सेनापती बापट, सशस्त्र क्रांतिकारक व समाजसेवक.
- १८९६ - डॉ. सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पक्षितज्ज्ञ.
- १९०५ - एस.एम. जोशी, ज्येष्ठ समाजवादी नेते.

### निधन

- १८६५ - एलिझाबेथ क्लेगहॉर्न गास्केल, लेखिका.
- १९४६ - पं. मदन मोहन मालवीय, बनारस हिंदू विद्यापीठाचे निर्माते.
- १९५९ - सेवानंद बाळूकाका कानिटकर तसेच बहुजन समाजाचे नेते केशवराज जेधे यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ३४



**आडवे शब्द**

१. निवडक, निवडलेले
४. पाप
६. पिता, वडील
९. एक पालेभाजी
११. नवा जोम असलेला, हुशार
१३. सरकारी
१४. लक्ष
१६. निमग्न, रममाण
१७. फुरसत, संधी
१९. कोळिष्टकावरील धागे
२०. हरबरा डाळीचे पीठ
२१. पत, अब्रू (हिंदी)
२३. सरहद्द
२४. इतर, बाकीचे
२६. नातेवाईक, आप्त
२८. च्या सह
३०. सोन्याचा पर्वत
३१. स्तुतीची गाणी
३३. कमलनयन
३७. पूर्वसंचित, काम, कार्य
३८. नवरा
३९. मडके
४०. कोणत्याही प्रकाराने
४३. शहर, गाव
४५. एक मंगलवाद्य
४६. किल्ल्याची संरक्षक भिंत
४९. सारखा
५१. जुने खोड असे असते
५२. किरकोळ सामान
५४. शरीर
५६. सडेतोडपणे, लगेच
५८. पोळी भाजण्याचे पात्र
५९. समुद्रकिनारा
६१. न सांभाळल्यास ताणली जाऊन तुटणारी
६२. बारा वर्षांचा काळ
६४. खराब
६६. मारुतीचा रावणराज्यातील पराक्रम
६९. सडक, मार्ग
७०. अनुमती
७४. कळस रचण्यासाठी आधी हा घालणे म्हत्त्वाचे
७५. पहाटेची आरती
७६. राष्ट्रगीताची सुरुवात
७८. अकस्मात
७९. शिस्तीचे धोरण
८०. उगवत्या सूर्याचा देश
८१. होडी

**उभे शब्द**

१. पगार
२. खंदक
३. काटकसर
४. गवताचे पान
५. किंचित कडू
७. धुंदी
८. वाळवी
९. विजार
१०. राष्ट्रपतीपदाचा सन्मान प्राप्त झालेले शास्त्रज्ञ
१२. पद्धतीनुसार
१५. प्रयत्न, धडपड
१८. पाताळ
२२. काथ्याकूट
२४. गुन्हा
२५. जन्म
२६. अपयशाचे खापर दुसर्‍यावर फोडणे या अर्थाचा वा.प्र.
२७. फिरता पहारा
२९. तापाचे लक्षण
३०. केर
३२. नळी
३४. आयुष्य
३५. स्वेटरचा धागा
३६. घर
४१. अभिनेता
४२. चित्राचा आराखडा
४४. एक शेंगभाजी
४५. युद्ध
४७. पाकसिद्धीसाठी ही शास्त्रशुद्ध माहीत असणे महत्त्वाचे
४८. तारेवरचा व्यायाम?
४९. षष्ठीची देवता
५०. फोडणीचा अथवा मिरच्या इ. चा तीव्र वास
५३. धर्माज्ञा, राजाज्ञा
५५. मगज
५६. अनंत फंदींनी रूढ केलेला काव्यप्रकार
५७. भांडण
६०. अंडी घालणारी कोंबडी
६३. पाढ्याची उजळणी
६५. गाडीचे छत
६७. रावण
६८. स्नान
७१. संमती
७२. गरज
७३. माकड
७४. साखरेचा रस
७६. जास्वंद
७७. अभिप्राय

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ३३ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.वैदेही ४.आराम ६.सदाशिव ८.खारट ११.वानवा १३.लहानसर १४.साल १५.राजाराम १८.हयगय १९.मयत २१.वतन २२.गाज २३.नवल २५.डहाळी २७.कथन २८.सकल ३१.मधुकर ३२.पाव ३३.मानवता ३४.रास ३६.जीव ३८.डामडौल ४०.मुजरा ४१.पातळ ४२.मोगरा ४४.भेदक ४६.कलकत्ता ४८.लवाद ४९.दर ५०.ओळख ५२.दवा ५५.वाफाळ ५७.डगर ५८.भारत ६०.वाकस ६२.विजार ६२अ.नख ६३.मखर ६५.डळमळीत ६६.कर्ता ६७.जप ६८.नाका ६९.लगत ७१.टपाल ७३.फटफटी ७४.राज ७५.कोळ ७६.मासा ७७.खार ७८.काक ७९.नकार ८०.जरकबरक ८१.कीर ८२.सय

उभे उत्तर : २.देवालय ३.हीन ५.रातोरात ६.समूहगान ७.वलय ८.खानदान ९.रस १०.टरफल १२.वारा १४.साम दाम दंड भेद १६.जावळी १७.मनकवडा १८.नर १८अ.यज २०.तडक २४.वनराज २६.हारजीत २८.सन २९.कवडीमोल ३०.लता ३३.मालमत्ता ३५.सराईत ३७.वळवळ ३९.मजलदरमजल ४०.मुराद ४१.पाक ४३.गवाक्ष ४५.दरवाजा ४७.कवा ५०.ओळ ५१.खडखडाट ५३.पोर ५४.पाकळी ५६.फारकत ५८.भार ५९.तडकाफडकी ६०.वामन ६१.सतलज ६२.विशालकोन ६४.खप ६८.नाट ७०.गळका ७२.पालक ७३.फरक ७४.राकस ७६अ.साज ७७.खार







दैनिक समर्थ गांवकरी दिपावली विशेषांक व घड्याळ माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांचें जनसंपर्क अधिकारी नामदेव कहांडळ.संगमनेर येथील नामांकित आरोटे हॉस्पिटल संचालक डॉ अतुल आरोटे.. डॉ स्वप्नाली आरोटे.आळेफाटा येथील सोनवणे हॉस्पिटल संचालक डॉ एस.आर . सोनवणे यांना प्रदान करताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे.समुह संपादक परीघाताई आरोटे. महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर




माहूर : माहूर पोलीस स्टेशनला आलेले नूतन पोलीस निरीक्षक देविदास चोपडे पदभार स्वीकारल्यानंतर रविवार दि.९ नोव्हेंबर २०२५ रोजी पोलीस स्टेशन हद्दीतील गावामध्ये भेट दिली असता आपल्या गावातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे असे आव्हान पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी ईवळेश्वर येथील गावकऱ्यांना सांगितले. गावातील छोटे मोठे वाद,तंटे गावामध्येच मिटवून घ्यावे जेणेकरून पोलीस प्रशासनाचा वेळ वाया घालू नये गावातील अवैध दारू विक्रीवर आळा घालण्यात यावे जेणेकरून गावात तंटे भानगडी निर्माण होणार नाही.याची दक्षता सर्व इवळेश्वर गावकऱ्यांनी घ्यावी. आता निवडणुकीचे आचारसंहिता सुरू आहेत एखाद्या चुकीचा संदेश टाकला तर ग्रुप ॲडमिनने ताबडतोब संदेश टाकणाऱ्यांना समज द्यावी आणि संदेश डिलीट करावा जेणेकरून तेढ निर्माण होणार नाही.

## थोडक्यात बातम्या...



### भिवंडी महानगरपालिकेच्या ९० जागांसाठी आरक्षण जाहीर

भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांच्या उपस्थितीत सार्वत्रिक निवडणूक 2025 करिता प्रभाग आरक्षण सोडत शहरातील अंजूरफाटा येथील मानसी भारत गडा पदवी महाविद्यालय च्या तळमजल्यावरील शांती चंदन सभागृह जाहीर करण्यात आली.महापालिकेच्या 23 प्रभागातील 90 जागांसाठी विद्यार्थ्यांच्या हातून चिठ्ठी उचलून आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके उपायुक्त विक्रम दराडे, निवडणूक सहाय्यक आयुक्त अजित महाडिक, जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांच्या सह शहरातील राजकीय पक्षांचे पदाधिकारी, इच्छुक उमेदवारांच्या उपस्थिती झालेल्या जाहीर झालेले आरक्षण हे 23 प्रभागातून निवडून येणाऱ्या 90 जागांपैकी 45 जागा या महिलांसाठी राखीव आरक्षित झाल्या आहेत.




### राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेसाठी १२ विद्यार्थ्यांची निवड

ओतूर (स. गांवकरी) : नवनीत ग्रुप यांचे वतीने दरवर्षी संपूर्ण देशात चित्रकला स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेत ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर मधील ५१२ विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यातील १२ विद्यार्थ्यांच्या चित्रांची उत्कृष्ट कलाकृती म्हणून निवड करण्यात आली.या कलाकृती राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पाठविण्यात आल्या आहेत अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. उत्कृष्ट कलाकृती म्हणून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे :- स्पंदन सचिन खरात,पल्लव पंकज घोलप ,स्वरा शेखर सैद, श्रेया सुनील जाधव,गौरव दिलीप शिंगोटे ,कृष्णा सुरेश गेंगजे ,श्रुती बाळू नलावडे ,नचिकेत प्रदीप सूर्यवंशी,वरद रामदास डोंगरे,आराध्य प्रभाकर दिघे,आरुष संतोष कांबळे,चिन्मय अभिजीत डुंबरे . या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे कलाविभाग प्रमुख संतोष सोनवणे व बाळासाहेब साबळे यांनी मार्गदर्शन केले.यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक यांचे ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे , प्रभाकर तांबे,राजेंद्र डुंबरे,रघूनाथ तांबे,प्रदीप गाढवे,पंकज घोलप , आत्माराम गाढवे,रोहीदास घुले, अमोल डुंबरे,नितिन तांबे,सिताराम डुंबरे,संजय वल्हवणकर ,राजश्री भालेकर , संजय हिरे,अनिल उकिरडे,अजित डांगे यांनी हार्दिक अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### खंडोबा आशीर्वाद देईल, पण असा बालीस. पणा केलं तर अंगलटच येईल

नायगाव (स. गांवकरी) : आपल्या गावचं काही देणे लागतो म्हणून या भावने पोटी मौजे घुंगराळा येथील राष्ट्रवादीचे युवा नेते तथा गावचे उपसरपंच वसंत पा.सुगावे यांनी दोन वर्षांपूर्वीच आपल्या गावातील खंडोबा माळसाकांत मंदिराच्या विविध कामासाठी एक कोटी ७५ लाख रुपये चा निधी शासनाकडून प्राप्त करून आपल्या गावातील ग्राम दैवताचे काही टक्के कामही करण्यात आले पण विद्यमान आ.राजेश पवार यांनी काम फतेह अवघ्या पंधरा तासांमध्येच हा निधी आपण उपलब्ध केलेला आहे अशी बॅनरबाजी केली यामुळे त्यांना घुंगराळा येथील खंडोबा दैवत आपणास आशीर्वाद देईल असे वाटले होते पण जीआर ची प्रतच वसंत सुगावे यांनी काढल्यावर आमदार महोदयाचा बालीस.पणा त्यांच्या अंगलट येतोय असे सद्यस्थितीत दिसून येते. नायगाव मतदारसंघाचे आ. राजेश पवार यांनी घुंगराळा येथील माळसांकात मंदिर परिसरात मंगल कार्यालयासह इतर विकासासाठी आपण अवघ्या पंधरा तासात एक कोटी ७५ लाखाचा निधी आणलो काम फत्तेह म्हणून बॅनरबाजी केली पण हा आमदार राजेश पवारांचा बालिशपणा काही नवीन नाही गेल्या चार दिवसापूर्वीच तहसीलदार डॉ.धम्मप्रिया गायकवाड हे आपल्या सासऱ्यांचे निधन झाल्याने रजेवर असताना तिथे आ. पवार जाऊन खुर्चीला पुष्पहार टाकून आपली स्टंटबाजी केली. यंदाच्या पूर परिस्थितीमुळे अक्षरांच्या शेतकऱ्याचे कंबरडे मोडले त्यांच्यावर अस्मानी संकट कोसळली या पूर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार अतुल सावे यांचा ३० ऑगस्ट रोजी दौरा विविध ठिकाणी जाऊन पाहणी केली शेतकऱ्यांचे अश्रू पुसले त्यांच्या समावेश येतील स्थानिक आमदार या नात्याने राजेश पवार हे राहणे गरजेचे होते पण आमदार महोदय विदेश दौऱ्यावर होते. परवाच नरसी येथे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी आढावा बैठक घेण्यात आली तेथील गटबाजी जाहीर रित्या उघड झाली नायगाव मतदारसंघात भाजपा मोठे करण्यात बालाजी बच्चेवार व श्रावण पाटील भिलवंडे यांचे मोठे योगदान आहे आपल्या भांडवली बळावर राजेश पवार पुढे आले उद्या अजून कोणीतरी येईल पण इथे निष्ठावंत म्हणून बच्चेवार व भिलवंडे पाटील यांचेच नाव कायम राहील आमदार राजेश पवार कोण्या तोऱ्याने चालतात हे समजणे गरजेचे आहे.

## दिल्ली स्फोट : अनेकांचा मृत्यू, चार महत्त्वाच्या प्रश्नांची अद्याप उत्तरे नाहीत!

दिल्ली : (समर्थ गांवकरी)

राजधानी दिल्ली पुन्हा एकदा हादरली आहे. लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ सोमवारी (10 नोव्हेंबर) सायंकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास एका ह्युंदाई आय-20 कारमध्ये झालेल्या स्फोटाने परिसराला अक्षरशः हलवून टाकले. या स्फोटात नऊ जणांचा मृत्यू झाल्याची अधिकृत पुष्टी मिळाली असून, काहीजण गंभीर जखमी झाले आहेत.

स्फोटानंतर काही सेकंदातच आग लागल्याने आजूबाजूच्या इतर वाहनांनाही फटका बसला. या घटनेनंतर पोलिस, अग्निशमन दल व आपत्कालीन सेवा त्वरीत घटनास्थळी दाखल झाल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी रात्री उशिरा घटनास्थळाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.



फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळावरून महत्त्वाचे नमुने गोळा करून प्रयोगशाळेत पाठवले आहेत. मात्र, या स्फोटाबाबत अद्याप अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.

**१. हा दहशतवादी हल्ला होता का?**

पोलीस प्रशासनाने अद्याप या घटनेला दहशतवादी हल्ला म्हणण्यास नकार दिला आहे.

दिल्ली पोलिस आयुक्तांनी सांगितले की, "या घटनेचा तपास अनेक यंत्रणा मिळून करत आहेत. फॉरेन्सिक अहवाल आल्यानंतरच स्पष्ट निष्कर्ष देता येईल."

फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीचे अधिकारी मोहम्मद वाहिद यांनी सांगितले, "घटनास्थळावरून घेतलेले नमुने प्रयोगशाळेत तपासासाठी पाठवले आहेत. तपासानंतरच स्फोटाचे खरे कारण समजू शकेल."

काही प्रत्यक्षदर्शींनी स्फोट सीएनजी टाकीमुळे झाल्याचा दावा केला आहे, मात्र पोलिसांकडून याबाबत अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

**२. स्फोटाचे नेमके कारण काय?**

कारमध्ये आधीपासून स्फोटक पदार्थ ठेवले होते का? की इंधन किंवा सीएनजी टाकीत तांत्रिक बिघाडामुळे स्फोट झाला? या प्रश्नाचे उत्तर अजूनही अस्पष्ट आहे.

प्राथमिक तपासात स्फोटाची तीव्रता पाहता तो अपघाती नसून नियोजित असल्याची शक्यताही पोलिस नाकारत नाहीत.

**३. कारचा मालक कोण आणि ती कुठून आली?**

स्फोट झालेल्या कारचा मालक कोण आहे, हे शोधण्यासाठी पोलिसांनी वाहनाचा रजिस्ट्रेशन क्रमांक आणि त्याचे तांत्रिक तपशील तपासण्यास सुरुवात केली आहे.

सध्या तपास अधिकारी त्या कारच्या हालचालींचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

काही सूत्रांच्या माहितीनुसार, ही कार काही तासांपासून परिसरात पार्किंगमध्ये उभी होती. नंतर ती हळूहळू पुढे सरकू लागली आणि काही क्षणांतच स्फोट झाला.

**४. या स्फोटाचे लक्ष्य कोण?**

हा स्फोट अपघाती होता का, की जाणीवपूर्वक घडवून आणला गेला, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. जर हा दहशतवादी कट असेल, तर लक्ष्य कोण होते — सामान्य नागरिक, पोलीस दल, की आसपास असलेले सरकारी अधिकारी?

सध्या तपास यंत्रणा या सर्व शक्यतांचा बारकाईने अभ्यास करत आहेत.

या स्फोटात मृत्युमुखी पडलेल्या नऊ जणांच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे.

परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, प्रशासनाने सुरक्षा कडक केली आहे.

फॉरेन्सिक तपासाचा अहवाल आल्यानंतरच स्फोटाचे नेमके कारण, त्यामागील हेतू आणि आरोपींबाबत स्पष्टता येणार आहे.

तोपर्यंत दिल्लीतील ही घटना अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवून गेली आहे — हा स्फोट अपघात होता की नियोजित हल्ला? कारमध्ये स्फोटक पदार्थ होते का? आणि या स्फोटामागे कोण?

## सकल मराठा समाजाचा एक दिवसीय धरणे आंदोलन समाज

नांदेड : (समर्थ गांवकरी)

अखंड मराठा समाजाचे दैवत मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचणाऱ्या माजी मंत्र्यासह सर्व आरोपीची कसून चौकशी करण्यात यावी व या प्रकरणाची सत्यता महाराष्ट्राच्या समोर यावी यासाठी आज नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकल मराठा समाजाच्या वतीने एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. मराठा आरक्षणाचे प्रणेते पाच कोटी मराठा समाजाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी पोट तिडके ने लढा देणारे मराठा नेते मनोज दादा जरांगे पाटील हे आता एक नाव राहिले नसून अखंड मराठा समाजासाठी



दैवत बनलेले आहेत,आपल्या शरीराची चाळणी करीत समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी वेगवेगळे आंदोलने आणि उपोषणे करून समाजाला न्याय मिळवून दिला.

अशा प्रामाणिक आणि इमानदार नेतृत्वाला कायमचे संपवण्यासाठी काही समाजविघातक लोकांनी कट रचल्याची बातमी टीव्ही चॅनलच्या माध्यमातून कानावर पडतात राज्यभरातील मराठा समाजाच्या भावना अतिशय तीव्र झाल्या.

## जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचे मार्गदर्शन

ठाणे : (समर्थ गांवकरी)

महिला व बालविकास विभागाच्या वतीने आयोजित "पोषण भी पढ़ाई भी" या महत्त्वपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ (भा.प्र.से.) यांनी जिजामाता वर्किंग विमेन्स हॉस्टेल (WWH), कोपरी, ठाणे येथील इमारतीत दि. १० नोव्हेंबर, २०२५ रोजी भेट देऊन अंगणवाडी सेविकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी गर्भावस्थेपासून बालक ६ वर्षांचे होईपर्यंतच्या वाढीमध्ये अंगणवाडी सेविकांची भूमिका, जबाबदारी आणि समाजातील त्यांचे योगदान या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. भेटीदरम्यान जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी प्रशिक्षण



वर्गात उपस्थित अंगणवाडी सेविकांशी थेट संवाद साधला आणि सांगितले की, "अंगणवाडी सेविका ही प्रत्येक बालकाच्या आयुष्यातील पहिली मार्गदर्शक असते. गर्भावस्थेपासून बालकाच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक वाढीत तिची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. सेविकांनी आपल्या कार्यातून प्रत्येक कुटुंबापर्यंत पोषण आणि शिक्षणाचा संदेश पोहोचवावा." तसेच त्यांनी संतुलित आहार, स्वच्छता, लसीकरण, प्री-स्कूल एज्युकेशन आणि पालकांचा सहभाग या विषयांवर माहिती देत, प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. यावेळी जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालविकास विभाग संजय बागुल, बालविकास प्रकल्प अधिकारी, नवी मुंबई, बालविकास प्रकल्प अधिकारी, मीरा-भाईंदर, सर्व मुख्य सेविका आणि प्रशिक्षणार्थी अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल यांनी सांगितले की, "पोषण भी पढ़ाई भी हा कार्यक्रम केवळ प्रशिक्षणापुरता मर्यादित नाही, तर तो बालविकासासाठीचा व्यापक उपक्रम आहे. सेविकांनी शिकलेल्या गोष्टी प्रत्यक्ष कार्यात राबवल्यास बालकांचे भविष्य घडविण्यात मोठा हातभार लागेल."

## "पंढरपूरचा विठोबा 'घागरीत' बंद केला तरी चालेल, पण मंदिर सर्वांसाठी खुलं असावं" - साने गुरुजींची निर्भीड हाक!

■ सर्व धर्म आणि जातींचा स्वीकार करणाऱ्या साने गुरुजींनी अस्पृश्यांसाठी मंदिराचे दरवाजे उघडे करण्याचा दिला होता सामाजिक संदेश!

**लेखन : डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून**

(समर्थ गांवकरी)

पंढरपूर येथील विठोबाच्या भक्तीने भारावलेली पंढरपूर नगरी हे महाराष्ट्राच्या श्रद्धेचं प्रतीक मानलं जातं. पण भक्तीच्या या भूमीत एक काळ असा होता की, विठोबा सर्वांचा आहे असं म्हटलं तरी मंदिराचे दरवाजे मात्र काही समाज घटकांसाठी बंद होते.

त्या काळातील सामाजिक विषमता, जातीभेद आणि अस्पृश्यतेच्या अंधारात एक तेजस्वी दीप बनून प्रकट झाले – साने गुरुजी, म्हणजेच पांडुरंग सदाशिव साने.

**मानवतेचा उपासक – साने गुरुजी :** १८९९ साली पालघर सारख्या छोट्या गावात जन्मलेले साने गुरुजी हे मूळचे शिक्षक. पण त्यांचं आयुष्य केवळ शिक्षणापुरतं मर्यादित राहिलं नाही; ते पुढे माणुसकी, समानता आणि समाजसुधारणा यांचे ज्वलंत प्रवक्ते बनले.

त्यांच्या लेखनात, भाषणात आणि कृतीत "सर्व धर्म, सर्व जाती, सर्व माणसं समान" हा संदेश झळकतो.

त्यांनी केवळ अस्पृश्यतेचा निषेध केला नाही, तर त्या प्रथेचा प्रत्यक्ष भंग करण्याचं धाडस दाखवलं.

**पंढरपूरचा विठोबा आणि अस्पृश्यांवरील बंदी :** त्याकाळी विठोबा भक्तांचा देव असला, तरी अस्पृश्य समाजाला पंढरपूरच्या मंदिरात प्रवेश नाकारला जात असे.

भक्तीभाव असूनही समाजातील एका घटकाला देवदर्शनापासून वंचित ठेवणं हे साने गुरुजींना सहन होत नव्हतं.

त्यांनी तीव्र शब्दांत समाजाला प्रश्न विचारला – "हा देव जर सर्वांचा असेल, तर त्याच्या मंदिराचे दरवाजे काहींसाठी बंद का ठेवले जातात?"

एका सभेत साने गुरुजींनी केलेले शब्द आजही लोकांच्या स्मरणात आहेत – "जर पंढरपूरचा विठोबा अस्पृश्यांसाठी मंदिराचे दरवाजे उघडत नसेल,

तर असा विठोबा 'घागरीत बंद' केला तरी चालेल!

पण देवाचं मंदिर सर्वांसाठी खुलं असलं पाहिजे!" या निर्भीड विधानाने केवळ समाजच नव्हे, तर धार्मिक व्यवस्थाही हादरली.

त्यांचा उद्देश देवाची निंदा करणे नव्हता; तर देवाला मानणाऱ्या माणसांनी मानवतेचा विसर टाकू नये हा संदेश देणे हा होता.

त्यांच्या या वाक्यातून समता, बंधुता आणि श्रद्धेतील प्रामाणिकता प्रकट होते.



साने गुरुजींनी फक्त बोलणं केलं नाही; त्यांनी जगून दाखवलं.

त्यांनी अस्पृश्य मुलांबरोबर राहून त्यांच्यासोबत जेवण, शिक्षण आणि प्रार्थना केल्या.

त्यांनी अस्पृश्यांसाठी विठोबा पूजन, कीर्तन आणि सामूहिक प्रार्थना यांचे आयोजन केले.

"जातिभेद" हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ समाजातील विषमता उघडपणे मांडणारा ठरला.

त्यांच्या "शामची आई" या अमर साहित्यकृतीतूनही त्यांनी मानवतेची ममत्वपूर्ण व्याख्या जगासमोर ठेवली.

त्यांचा हा मानवी दृष्टिकोन इतका प्रभावी होता की, अनेक अस्पृश्य समाजातील युवकांनी शिक्षण आणि आत्मसन्मानाची नवी दिशा घेतली.

मंदिर प्रवेश आंदोलनाची पार्श्वभूमी:

साने गुरुजींच्या विचारांचा काळ म्हणजे मंदिर प्रवेश आंदोलनांचा सुवर्णकाळ होता.

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरात मंदिरांचे दरवाजे सर्वांसाठी खुले केले होते;

महात्मा गांधींनी हरिजनांसाठी अभियानं राबवली होती;

तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळं सत्याग्रह आणि नाशिकमधील काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन उभारलं होतं.

या सगळ्या चळवळींमध्ये साने गुरुजींचा भावनिक आणि वैचारिक सहभाग महत्त्वाचा ठरला.

त्यांचा संदेश होता — "देव मानवाला वेगळं करत नाही. माणसाने देवासाठी उभारलेली भिंत म्हणजे श्रद्धेचा अपमान आहे."

सर्वसमावेशकतेचा अधोरेखित संदेश: साने गुरुजींचं जीवन म्हणजे विचार आणि कृतींचं अखंड मिश्रण.

ते म्हणत असत – "देव म्हणजे माणुसकी. देव कुणाचं खासगी मालमत्तेचं वस्तू नाही. महार, माळी, ब्राह्मण, मुसलमान, ख्रिस्ती – सर्वांचा देव एकच आहे."

त्यांच्या या विचारांमुळे केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक पातळीवरही क्रांती घडली.

त्यांनी धर्माला माणुसकीच्या मुळाशी जोडून ठेवलं आणि भक्तीला सामाजिक जबाबदारीचं रूप दिलं.

आजच्या काळातही साने गुरुजींचा संदेश जिवंत:

आज २१व्या शतकातही समाजात कधी-कधी जातीय भेदभाव, सामाजिक तटबंदी दिसते.

अशा वेळी साने गुरुजींचं ते एक वाक्य काळजाला भिडतं! "विठोबा 'घागरीत बंद' झाला तरी चालेल, पण मंदिर सर्वांसाठी उघडं असलं पाहिजे."

या वाक्यात धर्मनिरपेक्षता, समता आणि सामाजिक न्यायाची खरी व्याख्या दडलेली आहे.

त्यांनी दाखवून दिलं की, देवापर्यंत पोहोचायचा मार्ग जात, धर्म किंवा पंथ यावर अवलंबून नसतो —तो माणुसकीच्या भावनेतून जातो.

भक्ती म्हणजे मानवतेची पूजा:

साने गुरुजींच्या कार्याने पंढरपूरचं प्रतीकात्मक महत्त्व बदललं ! विठोबा केवळ भक्तांचा नव्हे, तर सर्व मानवांचा देव ठरला. त्यांनी समाजाला शिकवलं की, "भक्ती म्हणजे देवापुढे नतमस्तक होणं नव्हे; तर माणसातला देव ओळखणं."

साने गुरुजींचा हा विचार आजही पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या चोख्याभोवती घुमत राहतो. माणुसकी, समता आणि श्रद्धेच्या एकतेचा तो अखंड जयघोष आहे.

# जनगणना व मतदार नोंदणी कामे देऊ नयेत

## राज्य निवडणूक आयोगाला निवेदन

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी/ अधिकारी संघटनेतर्फे दिव्यांग कर्मचाऱ्यांना निवडणुकीची, जनगणनेची व मतदार नोंदणीची (BLO) कामे देऊ नयेत, या मागणीसाठी आज राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे निवेदन सादर करण्यात आले.

याप्रसंगी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिगंबर घाडगे-पाटील यांनी मा. सुरेश काकानी, सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई तसेच मा. श्री. चौकलींगम, प्रधान सचिव, राज्य निवडणूक निर्णय अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,भारत निवडणूक आयोग नवी दिल्ली यांच्या दि. ७ जून २०२३ रोजीच्या पत्र क्रमांक 464/INST/ EPS/2023/Election Official मधील मुद्दा क्रमांक ९ अन्वये (९.१ ते ९.४) दिव्यांग कर्मचाऱ्यांना



निवडणुकीची, जनगणनेची तसेच मतदार नोंदणीची कामे देऊ नयेत, अशा स्पष्ट लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत.तसेच या संदर्भात यापूर्वी १९९७ आणि २०१० सालीही केंद्रीय निवडणूक आयोग व राज्य सामान्य प्रशासन विभागाकडून अशाच सूचनांची अंमलबजावणी करण्यात आलेली होती. संघटनेने यावेळी विनंती केली की,भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सुधारित सूचनांनुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांना दिव्यांग कर्मचाऱ्यांना अशी कामे न देण्याबाबत तातडीने लेखी आदेश देण्यात यावेत. या भेटीदरम्यान राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकानी यांनी आश्वासन दिले की,केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदींनुसार आयोगाकडून प्राप्त निर्देशांचे तंतोतंत पालन केले जाईल.




नांदेड जिल्हा : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत हिवाळी २०२५ पदवी परीक्षा आज, दि. ११ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झाल्या आहेत. परिक्षेत्रातील नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली या चारही जिल्ह्यांतील एकूण १२४ परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्हीच्या सतत निगराणीखाली परीक्षा पार पडत आहेत. विद्यापीठाशी संलग्न ४०५ महाविद्यालयांमधील सुमारे एक लाख वीस हजार विद्यार्थी विविध शाखांच्या परीक्षेत सहभागी झाले आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान, मानव विज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन तसेच आंतरविद्याशाखीय अभ्यास मंडळ या शाखांतील विविध विषयांच्या परीक्षा सुरू आहेत.

## थोडक्यात बातम्या...



### अनभवणे यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश; शाखाप्रमुखपदाची जबाबदारी स्वीकारली

खारघर (स. गांवकरी) : वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. श्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली रुद्राक्ष अनभवणे यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे.या सोहळ्यादरम्यान रुद्राक्ष अनभवणे यांना प्रभाग क्र. ०५ खारघर शाखाप्रमुख म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली. या नियुक्तीबद्दल त्यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानत सांगितले की, “शिवसेना ही सामान्य जनतेच्या हक्कांसाठी झटणारी चळवळ आहे. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि शिंदे साहेबांचे नेतृत्व हेच आमच्या कार्याचे प्रेरणास्थान आहे. पक्षाच्या माध्यमातून समाजहिताचे कार्य करण्याचा माझा प्रयत्न राहील.”या प्रसंगी मा. श्री रामदासजी शेवाळे साहेब (जिल्हाप्रमुख पनवेल-रायगड) व मा. श्री प्रसादजी परब साहेब (खारघर शहरप्रमुख) उपस्थित होते. दोन्ही मान्यवरांनी रुद्राक्ष अनभवणे यांच्या पक्षप्रवेशाचे स्वागत करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला खारघरमधील शिवसैनिकांसह स्थानिक कार्यकर्त्यांची उत्स्फूर्त उपस्थिती होती. संपूर्ण परिसरात “जय महाराष्ट्र!” आणि “एकनाथ शिंदे साहेबांनो पुढे चला, आम्ही तुमच्यासोबत आहोत!” अशा घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले.

### गंगाधर ढवळे यांना पुरस्कार जाहीर; राज्य अधिवेशनात होणार गौरव



नायगाव (स. गांवकरी) : व्हॉइस ऑफ मीडिया आणि विवो एम इंटरनॅशनल फोरम या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या वतीने दिले जाणारे उत्कृष्ट जिल्हाध्यक्ष व तालुकाध्यक्ष पदाधिकारी पुरस्कार २०२५ जाहीर झाले आहेत यामध्ये नायगाव तालुका अध्यक्ष गंगाधर ढवळे यांना व्हाईस ऑफ मीडियाचा उत्कृष्ट पदाधिकारी पुरस्कार जाहीर झाला आहे. संघटनेचे मुख्य संयोजक तथा संचालक गोरक्षनाथ मदने यांनी आज पत्रकार परिषदेत ही घोषणा केली जगातील ५६ देशांमध्ये कार्यरत आणि चार लाख ७० हजार पत्रकार सदस्य संख्या असलेल्या जगातील क्रमांक एक पत्रकार संघटनेचे राज्य शिखर अधिवेशन येत्या १५ आणि १६ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथील इस्कॉन सभागृहात होत आहे या अधिवेशनात निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा गौरव प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे या निवड प्रक्रियेत प्रत्येक विभागातून एक जिल्हाध्यक्ष आणि एक तालुकाध्यक्ष यांची उत्कृष्ट कार्यासाठी निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्षांमध्ये व्यंकटेश धुडुमवार गडचिरोली, राजेश भालेराव जालना, रमाकांत पाटील नंदुरबार, अनिल करंदकर सातारा, मंगल डोंगरे ठाणे, रुपेश पाटील सिंधुदुर्ग यांचा समावेश आहे तर तालुकाध्यक्ष म्हणून राजू कापसे रामटेक, गंगाधर ढवळे नायगाव, उमेश काटे अमळनेर, गणेश आवळे मिरज, आणि भारत महात्रे वसई यांची निवड झालेली आहे. ढवळे यांच्या निवडीबद्दल नायगाव तालुका व्हॉइस ऑफ मीडियाच्या वतीने त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

### तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत तातळे व तेलोरे यांची चमकदार कामगिरी

खारघर (स. गांवकरी) : शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत साहेबराव तातळे व तेलोरे यांनी चमकदार कामगिरी करत वेगवेगळ्या खेळांमध्ये प्रथम क्रमांके परकविला आहे. पंचायत समिती राहुरी व शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी , शिक्षक यांच्यासाठी तालुकास्तरावर विवीध स्पधाचे आयोजन करण्यात आले होते राहुरी कृषी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत तालुक्यातील विवीध शाळा , महाविद्यालयातील शिक्षकोनी सहभाग नोंदविला यामध्ये देवळाली प्रवरा (ता. राहुरी) येथील श्री. छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातीलहिंदी विषयाचे शिक्षक साहेबराव तातळे यांनी गोळा फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला तर विज्ञान विषयाचे शिक्षक तेलोरे यांनी ४×१०० मीटर रिलेमध्ये प्रथम क्रमांक मिळविला या दोनही शिक्षकांची विभागीय पातळीवर होगार्या क्रिडा स्पर्धेसाठी निवड झाली असून त्यांच्या या यशाबद्दल श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य कडूस सर उपप्राचार्य शिंदे , पर्यवेक्षक डोपे यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# जिल्हास्तरीय महिला क्रिकेट स्पर्धेत सिस्टर निवेदिता शाळेचा संघप्राथक्रमकाने विजयी

**ठाणे:कल्याण: (समर्थ गांवकरी)**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका मा.उपायुक्त आयुक्त, क्रीडा यांच्या आदेशानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे क्रीडापर्यवेक्षक प्रविण कांबळे साहेब यांचा निर्देशानुसार व खेळ प्रमुख म्हणून क्रीडा समिती सदस्य, के.एम.अग्रवाल कॉलेज चे क्रीडा संचालक डॉ विजय सिंग यांचा नेतृत्वाखाली, क्रीडा समिती सदस्य , श्री.वाणी विद्याशाळेचे पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक श्री. गजानन वाघ,एम.एल.म्हात्रे व्यवसायिक महाविद्यालयाचे





क्रीडा संचालक,राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान विभागीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) कामेंट्रेटर डॉ.मनिलाल शिंपी यांचा यांचा कल्याण डोंबिवली महानगर पालिका प्रमुख उपस्थितीत,कल्याण डोंबिवली महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा 2025-26 चा नियोजनुसार मुलींची अंडर 17 वयोगटाची सिझन बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन युनियन क्रिकेट मैदान वायले नगर,खडकपाडा कल्याण पश्चिम येथे करण्यात आले होते.शालेय शासकीय जिल्हास्तरीय महिला क्रिकेट स्पर्धेत सिस्टर निवेदिता शाळेचा संघ प्रथम क्रमांकाने विजयी. ओमकार इंटरनॅशनल स्कूल द्वितीय क्रमांक तर श्री वाणी विद्याशाळेने तृतीय क्रमांक पटकावला. डोंबिवली पूर्वेतील सिस्टर निवेदिता शाळेच्या १७ वर्ष वयोगटातील मुलींच्या क्रिकेट संघाने अतिशय उत्कृष्ट फलंदाजी व गोलंदाजी करत अंतिम सामन्यात धडक मारली व त्याच जोमाने ओमकार इंटरनॅशनल शाळेचा मुलींचा क्रिकेट संघानेही अंतिम सामन्यात प्रवेश केला . व या दोन्ही संघात फायनलसाठी अत्यंत चुरस निर्माण झाली. परंतु सिस्टर निवेदिता संघाचा अचूक गोलंदाजीपुढे ओमकार इंटरनॅशनल शाळेचा मुलींचा क्रिकेट संघाचा फलंदाजांना फेकबाजी करता आली नाही, व अत्यंत कमी धावसंख्या उभारता आली.त्या धावांचे ध्येय सहज पूर्ण करत जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत सिस्टर निवेदिता शाळेने प्रथम क्रमांक पटकावला. ओमकार इंटरनॅशनल शाळेचा मुलींचा क्रिकेट संघ दुसऱ्या क्रमांक मिळवला. श्री वाणी विद्याशाळेचा मुलींचा क्रिकेट संघाचा तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले.

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी, वाणी विद्याशाळेचे क्रीडा शिक्षक आतिश ठाणगे, डॉनबॉस्को शाळेचे क्रीडा शिक्षक अमोल सर, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्रीडा स्पर्धांमध्ये संयुक्तपणे विशेष व मोलाचे योगदान देणारे श्री. अनिकेत वानखेडे यांनी स्कोअर बोर्ड काटेकोरपणे सांभाळण्याची जबाबदारी निभावली.सौ.राजश्री वानखेडे व अनिकेत वानखेडे यांचा हस्ते विजयी संघाचे ट्रॉफी देऊन अभिनंदन करण्यात आले.

# नामनिर्देशन भरण्याच्या दोन्ही दिवशी शांतता!

**वसमत : (समर्थ गांवकरी)**

- एकही अर्ज दाखल नाही
- सदस्य पदासाठी ७४ अर्ज, नगराध्यक्ष पदासाठी १० अर्जांची विक्री

वसमत नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 च्या पार्श्वभूमीवर आजपासून (दि.10 नोव्हेंबर) नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया औपचारिकपणे सुरू झाली. मात्र, (११ नोव्हेंबर)दुपारी 03.00 वाजेपर्यंत एकही उमेदवाराने आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले नसल्याने निवडणूक कार्यालयात संपूर्ण दिवसभर शांतता पाहायला मिळाली. दरम्यान, निवडणूक प्रक्रियेत उमेदवारांकडून रस दाखवण्यात येत असून सदस्य पदासाठी एकूण 74 नामनिर्देशन पत्रांची विक्री झाली आहे, तर नगराध्यक्ष पदासाठी 10 अर्ज विक्री झाल्याची माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली आहे.

आगामी काही दिवसांत विविध पक्षांचे गट, पॅनेल आणि स्वबळावर उमेदवारी देणाऱ्यांमध्ये जोरदार हालचाली सुरू होण्याची शक्यता आहे. विशेषतः नगराध्यक्ष पदासाठी कोण उमेदवार रिंगणात उतरतो याकडे वसमत शहराचे लक्ष लागले आहे.

# चिंचकुट वस्ती शाळेचा बदलला लुक

- अग्रीपंखचा महात्मा फुलेंना उपक्रम

**श्रीगोंदा तालुका :(समर्थ गांवकरी)**

अग्नीपंख फौंडेशनने कान्तीवीर महात्मा फुलेंना सलाम उपक्रम अंतर्गत लोकसहभागातून हिरडगाव येथील दुर्लक्षित चिंचकुट वस्ती शाळेत भागोलिक बदल केले त्यामुळे चिंचकुट वस्ती शाळेचा लुक बदलला आहे.

या कामाचे लोकार्पण आपुलकी मिशनचे जिल्हा समन्वय रमेश कासार उद्योजक संजयकुमार मचे गटविकास अधिकारी राणी फराटे गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी शालेय पोषण आहार योजनेचे तालुका अधिक्षक सत्यजित मच्छिंद्र यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी काकासाहेब




गुणवरे होते. रमेश कासार म्हणाले की आपुलकी मिशन अंतर्गत सहा कोटीचे काम झाले आहेत श्रीगोंद्यात अग्नीपंख फौंडेशन जिल्हा परिषद शाळांसाठी चांगले काम हाती घेतले आहे. संजयकुमार मचे म्हणाले कि मंदीरांना मदत करण्यापेक्षा ज्ञान मंदीरांना मदत करा. ग्रामीण भागातील सरकारी शाळा टिकणे काळाची गरज आहे गटविकास अधिकारी राणी फराटे म्हणाल्या की, लोकसहभागातून शाळा बदलाची चळवळ वाढली आहे अग्नीपंख फौंडेशन त्यासाठी सकारात्मक भावनेने काम करीत आहे. यावेळी कुसुमकुमारी कानडी नवनाथ दरेकर यांचीही भाषणे झाली. प्रास्ताविक उषा भोसले यांनी केले.

यावेळी गौरी शुगरचे मुख्य व्यवस्थापक रोहिदास यादव. विस्तार अधिकारी सुनीता वाजे केंद्रप्रमुख माणिक आढाव महेश दरेकर अंबादास दरेकर नवनाथ खामकर प्रकाश चव्हाण गोपाळराव डांगे सुनील जाधव गजानन ढवळे बाळासाहेब गिरमकर उत्तरेश्वर मोहोळकर विद्या बनकर अमोल दरेकर उपस्थित होते. सुत्रसंचलन रवी पंडीत यांनी तर आभार गोवर्धन दरेकर यांनी मानले.

# श्रीगोंद्यात महाविकास आघाडीची जोरदार तयारी : विजयाचा आत्मविश्वास

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने जोरदार तयारीला सुरुवात केली आहे. खासदार निलेश लंके, आमदार हेमंत ओगले, माजी आमदार दादा कळमकर, बाबासाहेब भोस, साजन पाचपुते, प्रशांत ओगले, विजय शेंडे, सुमित बोरुडे, गणेश भोस, निलेश मालपाणी आदी नेते एकत्र येत निवडणुकी संदर्भात पत्रकार परिषद घेण्यात आली.

साजन पाचपुते यांनी सांगितले की, निवडणूक जिंकणार अशीच तयारी आघाडीची सुरु आहे. ज्यांनी



विरोधी आमदारकी केली ते आज एकत्र आले आहेत. विरोधकाने वरच्या उमेदवारीचा दसका घेतला आहे, मात्र माविया १००% २२ जागा व नगराध्यक्षा पद जिंकणार आहे. कोणाचा गैरसमज असेल, तर तो दूर व्हावा. बाबासाहेब भोस यांनी स्पष्ट केले की, आघाडी पॅनेल करणार का नाही अशी शंका काहींना आहे, श्रीगोंदा शहरात खूप सुधारणा झाली आहे. नगरपरिषदेची सत्ता दिल्यास आरोग्य, पाणी, लाईट, गटारलाइन या सर्व सुविधा अधिक सक्षमपणे दिल्या जातील, असे ते म्हणाले.

माजी आमदार दादा कळमकर यांनी सांगितले की, आघाडीत मतभेद नाहीत. काही लोक समाजात वाद लावण्याचा प्रयत्न करत आहेत. कार्यकर्त्यांनी कंबर कसली तर विजय आपलाच आहे.

आमदार हेमंत ओगले यांनी सांगितले की, महा विकास आघाडी पूर्ण ताकदीने निवडणुकीत उतरली आहे. नव्या कार्यकर्त्यांना संधी मिळायला हवी. गेली २०-३० वर्षे तेच नगरसेवक पुन्हा-पुन्हा येतात. यावेळी २२ नगरसेवक व १ नगराध्यक्षा मिळून २३ जागांवर विजय मिळवणार आहोत. १७ तारखेला अधिकृत यादी जाहीर केली जाईल.

# शिर्डी नगरपरिषद निवडणूक – प्रभाग क्रमांक चार

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**



प्रभाग क्रमांक चारमधून सोमनाथ उर्फ पिंटू भाऊ कोते पाटील यांनी काल प्रभागातील नागरिकांच्या भेटीगाठी घेतल्या. या भेटीदरम्यान त्यांनी नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेतल्या व त्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन दिले. नागरिकांशी संवाद साधताना सोमनाथ भाऊंना प्रभागातील नागरिकांचा उत्स्फूर्त आणि उत्कृष्ट प्रतिसाद लाभला. नागरिकांनी आपल्या समस्या स्पष्टपणे मांडल्या, तर सोमनाथ भाऊंनी त्या समस्यांचे लवकरात लवकर निराकरण करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# जुन्नर तालुक्यात सावकारशाहीचा वाढता विळखा

## तरुणाई, शेतकरी, आणि लघुव्यवसायिकांचे जीवन उद्ध्वस्त; शासनाकडून ठोस निर्णयाची अपेक्षा

**जुन्नर : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका हा शेतकरी, फळउद्योग, आणि पर्यटनाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम परिसर मानला जातो. मात्र, मागील काही वर्षांपासून या तालुक्यात खाजगी सावकारशाहीचा विळखा दिवसेंदिवस घट्ट होत चालला आहे.

शेतीतून पुरेसं उत्पन्न न मिळणं मुख्य पीक म्हणजे कांदा आणि टोमॅटो या पिकांना बाजार भाव न मिळणे, बँकांकडून तातडीने कर्ज न मिळणं, आणि महागाईच्या चटके यामुळे छोटे व्यापारी, टपरीधारक, आणि शेतकरी वर्ग सावकारांच्या जाळ्यात अडकत आहेत. या सावकारशाहीमुळे आर्थिकच नव्हे तर मानसिक ताण वाढून आत्महत्यांच्या घटना वाढत आहेत.

जुन्नर ओतूरआणि आसपासच्या गावांमध्ये आजही अनेक ठिकाणी खाजगी सावकार बेकायदेशीरपणे पैसे उधार देतात. ते सहसा कोणताही परवाना घेत नाहीत. महिन्याला ५ ते १० टक्क्यांपर्यंत व्याज आकारतात, आणि वेळेवर पैसे न भरल्यास दुप्पट व्याज लावतात.

कर्ज फेडता न आल्यास सावकारांकडून धमक्या, सामाजिक अपमान, आणि कधी-कधी मारहाण अशा घटना होत आहेत. काही तरुणांनी या मानसिक त्रासाला कंटाळून आयुष्य संपविल्याच्या घटना तालुक्यात नोंदल्या गेल्या आहेत. तरुणांना या देशाचा कणा मानला जातो आणि हा देशाच्या कणाच मुजोर सावकार मोडून काढत आहेत मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने पुणे पोलीस आयुक्तांना जुन्नर तालुक्यातील खाजगी सावकारांना शोधून काढून जेरबंद करण्यात यावी अशी मागणी आता सामाजिक संघटनांकडून होत आहे

सावकारशाहीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने “महाराष्ट्र मनी लेंडिंग (रेग्युलेशन) अॅक्ट, २०१४” लागू केला आहे. या कायद्यानुसार –

प्रत्येक सावकाराने परवाना घेणे बंधनकारक आहे. व्याजदर मर्यादित ठेवले आहेत. अधिक व्याज आकारल्यास गुन्हा मानला जातो.

अनधिकृत वसुली, धमक्या किंवा बेकायदेशीर ताबा घेण्यास सक्त मनाई आहे.

परवाना नसलेल्या सावकारांविरुद्ध पोलिस कारवाई करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना दिला आहे.

तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया: नागरिक जिल्हाधिकारी कार्यालयात, पोलिस ठाण्यात किंवा ग्राहक संरक्षण मंडळाकडे लेखी तक्रार देऊ शकतात.

मात्र वास्तवात या कायद्याची अंमलबजावणी अत्यंत ढिसाळ आहे. अनेक गावांमध्ये सावकार आजही उघडपणे पैसे देतात, पण स्थानिक प्रशासन कारवाई टाळते किंवा दुर्लक्ष करते.जुन्नर तालुक्यात गेल्या दोन वर्षांत २० पेक्षा अधिक आत्महत्यांच्या घटना* स्थानिक प्रशासनाच्या नोंदीत आल्याचं सूत्रांनी सांगितलं.

## आर्थिक अडचणींचं मूळ : बँक यंत्रणेचं अपयश

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शासनाच्या मुद्रा योजना, प्रधानमंत्री रोजगार योजना, आणि सहकारी पतसंस्था यांचा लाभ प्रत्यक्षात फार कमी लोकांना मिळतो. “आम्ही लहान व्यापारी, हमीदार नाही, मालमत्तेची कागदपत्रं नाहीत, म्हणून बँका आमचं कर्ज नाकारतात. मग शेवटी सावकारच एकमेव पर्याय उरतो,” असं एका फळ विक्रेत्याने आपली व्यथा दैनिक राज्य लोकतंत्र्याच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितली ग्रामीण अर्थव्यवस्था अजूनही सावकारांवर अवलंबून आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# अशोक जगदाळे यांनी फडकविला अटकेपार झेंडा

**जुन्नर तालुका (समर्थ गांवकरी)**

जुन्नर शिवजन्मभूमीचे सुपुत्रअशोक जगदाळे यांनी गोवा येथे झालेल्या इंटरनॅशनल आयर्न मॅन स्पर्धेत विक्रमी कामगिरी करून आयर्न मॅन हा किताब पटकावला व जुन्नर तालुक्याचे शिवजन्मभूमीचे नाव राष्ट्रीय स्तरावर झळकावले.या स्पर्धेमध्ये २ किलोमीटर समुद्रामध्ये पोहणे,९० किलोमीटर अतिशय खडतर अशा रस्त्याने सायकलिंग करणे व २१ किलोमीटर रनिंग करणे या बाबींचा समावेश होता.या सर्व बाबी आठ तासांचे आत त्यांनी पूर्ण करून हा



किताब पटकावला.२७ देशांमधील स्पर्धकांचा यामध्ये समावेश होता. स्विमिंग करतांना लाटा आणि जल फिश यांना सामोरे जाऊन हे दोन किलोमीटर अंतर पूर्ण करावे लागते. सायकलिंग करताना ४० डिग्री सेल्सिअस तापमानाला सामोरे जात ही सायकलिंग पूर्ण करावी लागते.त्यांनी कोल्हापूर येथे बर्ग मॅन व लोहपुरुष हा किताब २०२४ मध्ये पटकावला होता.व २०२५ मध्ये ओझर येथे झालेल्या बर्गमन स्पर्धेत बर्गमॅन हा किताब पटकविला.

ऑडक्स इंडिया या क्लबमधून दोनशे, तीनशे, चारशे व ६००किलोमीटर सायकलिंग दिलेल्या वेळेपेक्षा अतिशय कमी वेळेमध्ये त्यांनी पूर्ण करून एस.आर.ही पदवी प्राप्त केली होती.पंढरपूर ते घुमान ही सायकल वारी सुद्धा त्यांनी २२ दिवसात पूर्ण केली आहे.

या यशामध्ये ओतूर सायकल ग्रुपचे सर्व सदस्य, ओझर स्विमिंग ग्रुप,विघ्नहर ट्रस्ट,ग्रामस्थ ओझर, व शिवजन्मभूमी तसेच जयसिंग डुंबरे,गणेश डुंबरे,प्रदिप गाढवे,सोपान नलावडे,अमोल तांबे, डॉ.राहुल तांबे,डॉ. अमोल डुंबरे यांचेही मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी विनम्रपणे सांगितले.

सर्व स्तरांतून अशोक जगदाळे यांचे कौतुक,शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



**नाशिक :** आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) आणि शंकराचार्य न्यास यांच्या समन्वयाने आयोजित "व्हॅल्यू एज्युकेशन" मूल्य संवर्धन स्पर्धा ही १ जुलै २०२५ रोजी सुरू करण्यात आली होती. ही परीक्षा ऑनलाइन माध्यमातून ओपन बुक स्वरूपात घेण्यात आली होती, व विद्यार्थ्यांनी ५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत उत्तरपत्रिका सादर करणे अपेक्षित होते.

## थोडक्यात बातम्या...



### जिल्हा परिषद केंद्रशाळा नगदवाडीला पुस्तकांची अनोखी भेट

खोडद (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रशाळा नगदवाडीला वाचनालयासाठी कविताताई संदिपान पवार यांच्या वतीने 50 दर्जेदार पुस्तके भेट स्वरूपात देण्यात आली. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी व वाचन संस्कृती समृद्ध व्हावी या उद्देशाने ही पुस्तके शाळेला भेट स्वरूपात देण्यात आल्याची माहिती नगदवाडी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश बाळासाहेब बढे यांनी दिली. या कार्यक्रमप्रसंगी नगदवाडी केंद्राच्या केंद्रप्रमुख वनिता बाळकृष्ण हांडे,नगदवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला गुलाबराव बोऱ्हाडे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश बढे,जुन्नर तालुका खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष अशोक बढे,शाळा व्यवस्थापन समितीच्या माजी अध्यक्ष दिपाली जाधव,सदस्य रघुनाथ बढे,महेश बढे,निवृत्ती बढे,विश्वास बढे, दिलीप कुतळ,बाबाजी बढे,बाळू गाडगे,सुनंदा भापकर,दत्तात्रय गाडगे आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमप्रसंगी शाळेतील शिक्षक मंगेश मेहेर,पंडित चौगुले,निलेश शेलार,विद्या वाघ,सुप्रिया अभंग,आशा आरेकर,उज्वला कांबळे व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश मेहेर यांनी केले तर आभार निलेश शेलार यांनी मानले.



### लायन्स क्लब ऑफ नारायणगावचे कार्य कौतुकास्पद - ला. राजेंद्र मुछाल

खोडद (स. गांवकरी) : लायन्स क्लब मल्टीपल ३२३४ च्या इंटरनॅशनल डायरेक्टर पदी माजी प्रांतपाल ला.राजेंद्र मुछाल यांची बहुमताने निवड झाल्याबद्दल लायन्स क्लब ऑफ नारायणगावच्या वतीने सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन नारायणगाव येथे मोठ्या उत्साहात सन्मान करण्यात आला. यानिमित्ताने व्हाईस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्रेयस दिक्षित, डिजी व्हिजिट चेअरपर्सन रवींद्र सातपुते, लायन्स क्लब ऑफ नारायणगावचे क्लबचे आधार आधारस्तंभ मनोज भळगट, अध्यक्ष अभिषेक भुजबळ, सचिव योगेश रायकर, माजी अध्यक्ष राजेंद्र देसाई, सदस्य प्रशांत इचके, विशाल बोऱ्हाडे, अभय पाटे, प्रकाश निमसे, गिरीश मुनोत, सुधीर भागवत, अशफाक पटेल, सारिका रायकर यांसह सदस्य उपस्थित होते. यावेळी बोलताना श्री.मुछाल म्हणाले की, ग्रामीण भागात चांगली आरोग्यसेवा, जिल्हा परिषद शाळांचा दर्जा वाढवून चांगले शिक्षण, पर्यावरण संरक्षणासाठी देवराई निर्मिती, ई वेस्ट संकलन आणि विल्हेवाट या उपक्रमांवर प्रामुख्याने काम करण्याचे उद्दीष्ट असल्याचे सांगत लायन्स क्लब ऑफ नारायणगावचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगत पुढील कामासाठी मार्गदर्शन केले. यानिमित्ताने मनोज भळगट, अभिषेक भुजबळ, योगेश रायकर यांनी मनोगत व्यक्त करत ला.मुछाल यांच्या मार्गदर्शनाखाली क्लब अधिक गतिमान पद्धतीने चांगले उपक्रम राबवेल असे सांगत निवडीबद्दल शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर भागवत यांनी केले तर आभार राजेंद्र देसाई यांनी मानले.

# आशीर्वादाने जामखेड नगर परिषदेवर भाजपचाच झेंडा फडकेल

- निवडणुकीत २४+ १ = २५
- विधान परिषद सभापती प्रा. शिंदे यांनी केला विश्वास व्यक्त

**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

जामखेड शहराचा विकास वैयक्तिक विकास नाही. संपूर्ण शहराचा कायापालट करायचा आहे. यासाठी मोठ्या निधीची गरज आहे. केंद्रात राज्यात भाजपाचे सरकार आहे. मागच्या निवडणुकीत झालेल्या चुका, पुन्हा नकोत. तेव्हा जामखेड नगरपरिषदेवर पुर्ण बहुमताने भाजपची सत्ता असणे आवश्यक आहे. त्यामुळे या निवडणुकीत २४+ १ = २५ विरूद्ध ० असा विजय मिळवत जनतेच्या आशीर्वादाने जामखेड नगर परिषदेवर भाजपचाच झेंडा फडकेल असा विश्वास विधान परिषद सभापती प्रा.शिंदे यांनी व्यक्त केला.



जामखेड नगरपरिषद निवडणुक २०२५ च्या अनुषंगाने नगराध्यक्ष, नगरसेवक पदाच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बैठकीदरम्यान विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे बोलत होते. यावेळी भाजपा पक्षाचे जामखेड निवडणूक प्रभारी शेखर खरमरे, जिल्हाध्यक्षा महिला मोर्चा प्रतिभा रेणुकर, जेष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात, माजी सभापती डॉ भगवान मुरूमकर, बाजार समीतीचे सभापती पै. शरद कार्ले, भाजपा शहर मंडल अध्यक्ष संजय काशिद, तालुका अध्यक्ष बापुराव ढवळे, प्रविण चोरडीया, ॲड. अजय काशिद, मनोज कुलकर्णी, रविंद्र सुरवसे, व्यापारी संघटनेचे शहराध्यक्ष पिंटूशेठ बोरा, नगराध्यक्षपदाच्या इच्छुक सुनिता मधुकर राळेभात, प्रांजल चिंतामणी, रोहिणी काशिद,

प्रविण चोरडीया, ॲड. अजय काशिद, मनोज कुलकर्णी, रविंद्र सुरवसे, व्यापारी संघटनेचे शहराध्यक्ष पिंटूशेठ बोरा, वैशाली झेंडे तसेच नगरसेवक पदाचे शेकडो इच्छुक उमेदवार व त्यांचे समर्थक उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प्रा. शिंदे म्हणाले की, मी कामापुरता मामा नाही. विरोधकांचेही फोन उचलतो. नाराजी नको, शहराच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे. उमेदवारीबाबत कठोर भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले, उमेदवारी देतांना गेल्या वेळी जी चूक झाली, ती यावेळी होणार नाही. कोणी कीतीही जवळचा असला तरी कोणत्याही शिफारशीवर तिकीट दिले जाणार नाही. लोकांच्या मनात असणाऱ्या, सर्व्हेमध्ये स्विकारल्या गेलेल्या व्यक्तीलाच उमेदवारी दिली जाईल. त्यासाठी पक्षाने याबाबत काही पदाधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली आहे.

यावेळी बोलताना ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात म्हणाले की, या नगरपरिषद निवडणुकीकडे आपण सर्वांनी डोळसपणे पाहिले पाहिजे. आज केंद्रात व महाराष्ट्रातील भारतीय जनता पार्टीची सत्ता आहे. पार्टीचे कार्यकर्ते व चाहते म्हणून आपल्याला सर्वांना माहिती आहे की, जर नगर परिषदेची सत्ता त्या बाजूने असून तर काहीतरी मिळते. त्यामुळे आपले नेते व विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे साहेब यांच्यामुळे जामखेड शहरात अनेक विकास कामे झालेली आहेत. जामखेड तालुक्यातील अनेक योजना झालेल्या आहेत. कधी नव्हे ते हजारो कोटींची कामे आपल्या मतदारसंघात झालेली आहेत. त्यामुळे सत्तेत जर आपला माणूस असेल तर आपला सर्व बाजूंनी विकास होईल यासाठी जामखेडकरांनी नगर अध्यक्षासह सर्व नगरसेवक भारतीय जनता पार्टीचे निवडून दिले पाहिजेत.

यावेळी बोलताना माजी नगरसेवक अमित चिंतामणी म्हणाले की, जामखेड शहरात जो विकास झालेला आहे तो खऱ्या अर्थाने विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्यामुळेच झालेला आहे.

## चित्रकला स्पर्धेसाठी १२ विद्यार्थ्यांची निवड


**बनकरफाटा : (समर्थ गांवकरी)**

नवनीत ग्रुप यांचे वतीने दरवर्षी संपूर्ण देशात चित्रकला स्पर्धा आयोजित केली जाते.या स्पर्धेत ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर मधील ५१२ विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यातील १२ विद्यार्थ्यांच्या चित्रांची उत्कृष्ट कलाकृती म्हणून निवड करण्यात आली.या कलाकृती राज्य- स्तरीय स्पर्धेसाठी पाठविण्यात आल्या आहेत अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. उत्कृष्ट कलाकृती म्हणून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे:--स्पंदन खरात,पल्लव घोलप,स्वरा सैद,श्रेया जाधव,गौरव शिंगोटे,कृष्णा गेंगजे,श्रुती नलावडे,नचिकेत सूर्यवंशी,वरद डोंगरे आराध्य दिघे,आरुष कांबळे,चिन्मय डुंबरे या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे कलाविभाग प्रमुख संतोष सोनवणे व बाळासाहेब साबळे यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक यांचे ग्रामविकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे , प्रभाकर तांबे , राजेंद्र डुंबरे , रघूनाथ तांबे , प्रदीप गाढवे , पंकज घोलप , आत्माराम गाढवे , रोहीदास घुले, अमोल डुंबरे , नितिन तांबे , सिताराम डुंबरे , संजय वल्हवणकर ,राजश्री भालेकर , संजय हिरे , अनिल उकिरडे , अजित डांगे यांनी हार्दिक अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी विविध प्रवर्गांचे आरक्षण जाहीर

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला), सर्वसाधारण महिला यांच्यासाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता राम गणेश गडकरी रंगायतन येथे प्रशासक तथा महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली आज आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यात अनुसूचित जाती (महिला) प्रवर्गासाठी ०५ जागा, अनुसूचित जमाती (महिला) प्रवर्गासाठी ०२ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) १८ जागा आणि सर्वसाधारण (महिला)




प्रवर्गातील ४१ जागांची सोडत काढण्यात आली. अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (निवडणूक) उमेश बिरारी, सहाय्यक आयुक्त (निवडणूक) बाळू पिचड यांच्या उपस्थितीत महापालिका शाळेमधील विद्यार्थिनींच्या हस्ते ही आरक्षण सोडत काढण्यात आली. या संपूर्ण सोडत प्रक्रियेचे नेटके संचालन उपायुक्त (निवडणूक) उमेश बिरारी यांनी केले. ठाणे महापालिकेच्या शाळा क्र. ७ मधील आठवी इयत्तेत शिकणाऱ्या पिहू गौंड आणि अंशिका प्रजापती या विद्यार्थिनींच्या हस्ते सोडत काढण्यात आली. ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या १८,४१,४८८ इतकी आहे. त्यामध्ये अनुसूचित जातींची लोकसंख्या १,२६,००३, अनुसूचित जमातींची लोकसंख्या ४२,६९८ इतकी आहे. राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे, महापालिकेच्या एकूण १३१ पैकी, अनुसूचित जातींसाठी ०९ जागा, अनुसूचित जमातींसाठी ०३ जागा, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३५ जागा आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी ८४ जागा आहेत. एकूण १३१ जागांपैकी महिलांसाठी ६६ जागा आरक्षित आहेत. त्यापैकी, अनुसूचित जातींच्या ०५ जागा, अनुसूचित जमातींच्या ०२ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्गातील १८ जागा आणि सर्वसाधारण प्रवर्गातील ४१ जागा महिलांसाठी राखीव आहेत. ठाणे महानगरपालिकेत एकूण ३३ प्रभाग आहेत. त्या पैकी, ३२ प्रभाग हे चार सदस्यीय असून ०१ प्रभाग तीन सदस्यीय आहे. या ३३ प्रभागातून ठाणे महानगरपालिकेत एकूण १३१ सदस्य निवडले जाणार आहेत. त्यांची अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

# परिस्थितीवर मात करत सावद गावची प्रियंका जाधव बनली 'सी.ए'

- दिव्यांग असूनही अथक प्रयत्न आणि आई-वडिलांच्या कष्टातून मिळवले यश

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील सावद या ग्रामीण भागातील प्रियंका जिजाबाई सुरेश जाधव हिने सी.ए. (चार्टर्ड अकाउंटंट) परीक्षा उत्तीर्ण होऊन संपूर्ण तालुक्याचे नाव उज्वल केले आहे. प्रतिकूल परिस्थितीत भाजीपाला विकून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या



आई-वडिलांची लाडकी लेक असलेल्या प्रियांकाने आपल्या मेहनतीने व चिकाटीने हे यश मिळवले आहे. दिव्यांग असलेली प्रियंका लहानपणापासूनच अभ्यासात हुशार होती. दहावी आणि पदवी परीक्षेत उत्तम गुण मिळवत तिने बालपणापासून उराशी बाळगलेले 'सी.ए. बनण्याचे' स्वप्न अखेर सत्यात उतरवले आहे. तिचे वडील सुरेश जाधव हे गोडाऊनमध्ये साफसफाईचे काम करतात. आई शेतात भाजीपाला पिकवून व विक्री करून कुटुंबाचा सांभाळ करते. अशा कठीण परिस्थितीतही मुलीने सी.ए. परीक्षा उत्तीर्ण केल्याने संपूर्ण कुटुंबासह गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.सी. ए. झाल्याबद्दल प्रियंका जाधव हिच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



माझ्या आईने शेतात दिवसभर उन्हात काम करून, भाजीपाला विकून मला शिकवले. वडिलांनी गोडाऊनमध्ये साफसफाईचे काम करत शिक्षणासाठी पाठिंबा दिला. त्यांच्या त्यागामुळेच मला सी.ए. परीक्षेत यश मिळाले. माझा विश्वास आहे की कोणत्याही दिव्यांग व्यक्तीने स्वतःला कमी समजू नये. आपल्यातही मोठं होण्याची क्षमता, जिद्द आणि सामर्थ्य आहे.

**— सी.ए. प्रियंका जाधव**

# आरोग्य विभागातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा जिल्हा परिषद कार्यालय समोर एल्गार

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( सा.प्र.वि.) महेश पाटील यांनी मधस्थी करत मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांचे दालनात प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी हर्षल नेहते, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी राजेंद्र बागूल आणि संघटनेचे पदाधिकारी यांचे समवेत आरोग्य विभागातील सेवानिवृत कर्मचाऱ्यांचे प्रलंबीत प्रश्नावर सविस्तर चर्चा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि १९ नोव्हेबर २०२५ रोजी नविन प्रशासकीय इमारतीत उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( साप्रवि) यांचे मार्फत जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, व सर्व कनिष्ठ



सहाय्यक (तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय) यांची एकत्रीत बैठक आयोजीत करून पुढील पेन्शन अदालत दिनांक ९ डिसेंबर २०२५ पर्यन्त सर्व प्रलंबीत प्रश्न तत्काळ मार्गी लावावे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले. आणि प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी देखील लेखी आश्वासन आंदोलनकर्ते यांना दिल्याने दुपार नंतर धरणे आंदोलन तुर्त स्थगीत करण्यात आले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, नासिक जिल्हा परिषद अर्तगत आरोग्य विभागातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती नंतर देय असलेले सर्व आर्थिक लाभ वर्षानुवर्षे प्रलंबीत ठेवुन मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषन करण्यात आले आहे. प्रलंबीत प्रश्नाबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे सातत्याने पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी न लागल्याने आरोग्य विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी यांनी संताप व्यक्त करत आज रोजी दि ११ नोव्हेबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे नेतृत्वाखाली जिल्हा परिषद कार्यालयाचे समोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी १५० हुन अधिक सेवानिवृत्त आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यीका व इतर कर्मचारी धरणे आंदोलनात सहभागी होते. आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यीका, व इतर कर्मचारी यांना सेवानिवृत्त होवून सुमारे ५ ते १० वर्षे कालावधी उलटूनही अद्याप पावेतो आश्वासीत प्रगती योजने अर्तगत १०:२०: ३० लाभ, पेन्शन लाभ, गटविमा, उपदान, रजा रोखीकरन, अंशराशीकरन, भविष्य निर्वाह निधी रक्कम सह सेवानिवत्ती नंतरचे इतर लाभ मिळालेले नाहीत, काहींचे ६ वा, ७ वा वेतन आयोगातील हप्ते भविष्य निर्वाह निधीत जमा नाहीत. तर काहीना ७ वा वेतन प्रमाणे सुधारीत वेतन श्रेणी लागू नाही. काहींचे सेवा पुस्तके अद्यावत नाहीत.असे सुमारे १५० हुन अधिक सेवानिवृत्त कर्मचारी यांना आरोग्य विभाग प्रशासनाने वर्षानुवर्षे वंचीत ठेवल्याची बाब समोर आली आहे. विशेष बाब अशी की यामध्ये सेवानिवृत्त महिला कर्मचारी यांचेच प्रश्न मोठ्या प्रमाणावर प्रलंबीत ठेवण्यात आले आहेत. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देखील जिल्हा आरोग्य अधिकारी सुधाकर मोरे यांना कारणे दाखवा नोटीस देवुनही अद्यापही प्रश्न प्रलंबीत ठेवले आहेत. सेवानिवृत्त कर्मचारी यांचे प्रलंबीत प्रश्नाबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे दालनात गेले ४ वर्षापासुन दरमहा दुसऱ्या मंगळवारी पेन्शन अदालत घेण्यात येत आहे. काही तरी पदरात पडेल या आशेने सेवानिवृत्त कर्मचारी हे उतार वयात अनेक शारीरीक व्याधी घेवुन गेले ४ वर्षापासुन आरोग्य विभागाचे उभरंठे झिझवत पेन्शन अदालत मध्ये निव्वळ खेटया मारण्याचे काम करत आहेत. प्रत्येक पेन्शन अदालत मध्ये टोलवा - टोलवी करत निव्वळ कालापव्यय करण्यात आलेला आहे. उतार वयातील सेवानिवृत्त महिला कर्मचारी यांना जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी त्यांचे दालनात ६ - ६ तास उभे ताटकळत ठेवत अवमानकारक वागणूक दिलेली आहे. मुख्य कार्यकारी

# वेदांचे भंडार व आत्म ज्ञानाचा ठेवाचे दार ज्ञानेश्वर माऊलींनी उघडले

**ह भ प श्रीराम गाडेकर**

शिवनेरी : (समर्थ गांवकरी)



बागलोहरे गावठाण नारायणगाव ता. जुन्नर येथे श्री संत सद्गुरु गोपाजी बाबा महाराज संजीवन समाधी पायी दिंडी सोहळा कोपरगाव तालुका बहादपूर ते श्री क्षेत्र आळंदी गेली तीस वर्षे स्वर्गीय कै. लक्ष्मण नागुजी नाईक व ग्रामस्थांच्या वतीने रविवार दिनांक ९ सायंकाळी ५ ते पहाटे ५ पर्यंत सर्व वारकऱ्यांची सेवा करण्यात आली आहे.. या ठिकाणी सायंकाळी ठीक ५ : ३० हरीपाठ व ६ : ४५ महाआरती तसेच पहाटे ५ वा. काकड आरती घेण्यात आली. याप्रसंगी सर्व महात्मा फुले सोसायटी कार्यकारी संचालक विजय नाईक, संदीप नाईक , माजी आयकर अधिकारी अशोक डोके, महात्मा फुले शाखा अधिकारी बाळासाहेब घोडेकर, माजी पाटबंधारे अधिकारी रंगनाथ नाईक, पत्रकार राजेश डोके उपस्थित होते.

ह भ प श्रीराम गाडेकर यांनी रात्री ८ वा. किर्तनरुपी सेवेमधून श्री संत चोखोबा महाराज यांचा " वघडोनी वेदार्थाचा ठेवा । केला तरणोपाय जीवा ॥१॥ ऐसा समर्थ ज्ञानदेव। तया चरणी ठेवा भाव " ॥ २ ॥ या अभंगामधून सांगितले की, वेदांचे भंडार व आत्मज्ञानाचा ठेवाचे दार ज्ञानेश्वर माऊलींनी उघडले. यामुळे सर्व संतांनी ज्ञानोबारायांना वंदन केले. जगात दुःखी कोणी राहू नये सर्वांनी समाधानी रहा . धर्माप्रमाणे आचरण, प्रत्येक गोष्टीला सहाय्य घेण्याची गरज आहे. गीता, रामायण, महाभारत , सर्व संत व छत्रपती शिवाजी महाराज यांची माहिती या कीर्तनात ह भ प श्रीराम गाडेकर यांनी सांगितली. याप्रसंगी महिला भगिनींनी डोक्यावर तुळस, भाविकांनी विणा, टाळ, पखवाज वादक व भाविक भक्तजन यांच्या उपस्थितीत ज्ञानोबा माऊली तुकाराम......, ज्ञानेश्वर माऊली तुकाराम ......., जय जय राम कृष्ण हरी ..... गजर करत सेवा सादर केली.स्वागत संतोष नाईक, सूत्रसंचालन जालिंदर नाईक व आभार विक्रम नाईक यांनी मानले.



रावेर : रावेर तालुका स्तरीय मूल्यवर्धन शिक्षक प्रशिक्षणस नुकतीच रावेर सरस्वती विद्या या शाळेत सुरवात झाली हे प्रशिक्षक 10 नोव्हबर ते 15 नोव्हबर या काळा त दहा ते पाच यावेळेत होणार आहे गटशिक्षणाधिकारी साहेबराव शिंदे शिक्षण विस्तार अधिकारी संगीता पाटील मूल्यवर्धन तालुका समन्वय योगेश कपले तसेच सरस्वती विद्या मंदिर रावेर या 4:30 अध्यक्ष जयंती कुलकर्णीसर्च इतनेस अशोक शिंदे मुख्याध्यापक राजकुमार जैन यांच्या उपस्थित प्रशिक्षण प्रशिक्षणाचे उद्घाटन करण्यात आले हे प्रशिक्षण दोन टप्प्यामध्ये असून पहिल्या टप्प्यात 350 प्रशिक्षणार्थी शिक्षक प्रशिक्षण घेत आहेत.

## थोडक्यात बातम्या...



### सकल मातंग समाजाच्या वतीने लहू शक्ती भीमशक्ती महागर्जना मोर्चा संपन्न

अहिल्यानगर (स. गांवकरी) : सकल मातंग समाजाच्या वतीने आज लहू शक्ती भीमशक्ती महागर्जना मोर्चा विविध मागण्यासाठी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आला होता. यावेळी सुनील उमाप, विजुभाऊ पठारे,राम वडागळे,राम काते,अंकुश मोहिते,सुमित गायकवाड, अशोकराव गायकवाड,अजिंक्य भैय्या चांदणे,शाहू राजे वडागळे,पप्पू पाटील,रंजीत वैरागर,अजय पठारे,प्रदीप भाऊ सरोदे,निलेश सरोदे,संदीप सकट ,सचिन बगाडे,विनोद वैरागर,ज्ञानेश्वर राक्षे,बाळासाहेब लोंढे,राहुल जगधने,सौ शितल वडागळे,सौ अंजना शिरसाट,जय भोसले, रमेश वायदंडे आदींसह मोठ्या संख्रेने सकल मातंग समाज व सकल जय भीम समाज सर्व पदे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. प्रथम लालटाकी क्रांतीगुरु लहुजी वस्ताद चौक येथे सभा घेण्यात आली यावेळी मान्यवरांनी जातीयवादी शक्तीवर,सोनई पोलिसांवर पक्षपाती पणाची टीका केली. मातंग समाजाला जाहिरसभा घेऊन जातीवर शिवीगाळ करणाऱ्यावर गुन्हे दाखल करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी,अनु.जातीचे अ.ब.क.ड व वर्गीकरणाची त्वरीत घोषना करावी,संजर वैरागर हल्ला करणाऱ्यांवर मोका अंतर्गत गुन्हे दाखल करून कुटुंबास पोलीस संरक्षण दयावे,दलित समाजावर खोटे गुन्हे मागे घेण्यात यावे.अमोल वांडेकर,अनिल शेटे,आकाश बेग,संदिप लांडे यांचे वडील यांच्यावर दंगल भडकवणे, जिवे मारण्याची धमकी देणे या गुन्ह्याची कलमे नोंदवुन विशेष जन सुरक्षा कायदेअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावे.अश्या मागण्या करण्यात आल्या. नंतर मोर्चाची पायी सुरुवात करण्यात आली क्रांतीगुरु लहुजी वस्ताद चौक ते पत्रकार चौक, तारकपुर बसस्थानक, डिएसपी.चौक , महानगरपालिका,जिल्हाधिकारी कार्यालयवर मोर्चा काढण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी याना निवेदन देण्यात आले व जर आरोपी लवकर पकडले नाही तर राज्यात व मुबंईत असा महामोर्चा काढण्यात येईल असे सांगण्यात आले.

### “मी माझे आयपीएस अधिकारी होण्याचे स्वप्न जगतोय.”

पुणे (स. गांवकरी) : टीव्हीवरील बहुगुणी अभिनयासाठी ओळखला जाणारा अभिनेता फर्मान हैदर सध्या झी टीव्हीवरील नव्या मालिकेत ‘जगद्धात्री’ मध्ये दमदार आणि ॲक्शनने भरलेली भूमिका साकारत आहे. ही मालिका स्त्रीच्या दुहेरी जीवनाची, तिच्या जिद्दीची आणि अंतर्गत सामर्थ्याची प्रभावी कहाणी मांडते. फर्मान यात जगद्धात्रीचा विश्वासू मित्र आणि आयपीएस अधिकारी शिवायची भूमिका साकारत आहे. शिवाय आपल्या वेदना आपल्या विनोदबुद्धी आणि आकर्षक व्यक्तिमत्त्वामागे लपवतो. जगद्धात्री आणि शिवायची साथ ही मैत्री, समानता आणि अव्यक्त शक्तीचे प्रतीक ठरते. या भूमिकेबद्दल बोलताना फर्मान म्हणाला की या मालिकेमुळे त्याचे लहानपणीचे आयपीएस अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण झाले आहे. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना फर्मान म्हणाला, “लहानपणापासूनच माझे आयपीएस अधिकारी होण्याचे स्वप्न होते. पण माझ्या नशिबात अभिनय लिहिलेला होता आणि ‘जगद्धात्री’ मालिकेमुळे माझे ते स्वप्न पडद्यावर जगण्याची संधी मिळाली आहे. शिवायची भूमिका साकारणे माझ्यासाठी अत्यंत समाधानकारक अनुभव ठरला आहे. यात मला आयपीएस अधिकाऱ्यांचा शिस्तबद्ध आणि निर्धारपूर्ण स्वभाव दाखवता येतो तसेच त्यांच्या तीव्र भावना व्यक्त करता येतात. या भूमिकेचे आणखी एक आकर्षण म्हणजे ॲक्शन! मी जबरदस्त पाठलागाच्या दृश्यांपासून ते दमदार लढाईच्या सीन्सपर्यंत स्वतः सर्व स्टंट्स केले आहेत. हे नक्कीच आव्हानात्मक आहे, पण त्यातून मिळणारा उत्साह आणि जोश मला माझ्या पात्राच्या सामर्थ्याशी आणि त्याच्या आत्म्याशी अधिक जोडतो.”

# निमगाव वाघात मुला-मुलींसाठी कराटे व शिवकालीन मर्दानी खेळ प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ

- स्वसंरक्षणाबरोबर परंपरेचे जतन करण्याचा उपक्रम
- शिवकालीन मर्दानी खेळ हे आपल्या संस्कृतीचे मूळ व स्वसंरक्षण मुलींसाठी काळाची गरज - पै. नाना डोंगरे

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



अहमदनगर शोतोकान कराटे डो असोसिएशन आणि अहिल्यानगर जिल्हा सिलंबम असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने निमगाव वाघा (ता. नगर) येथे शालेय मुला-मुलींसाठी स्वसंरक्षण व शिवकालीन मर्दानी खेळांचे प्रशिक्षण शिबिराला प्रारंभ झाले आहे. या प्रशिक्षण वर्गात गावाच्या पंचक्रोशीतील मुला-मुलींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

या शिबिराचे उद्घाटन ग्रामपंचायत सरपंच उज्वलाताई कापसे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिलंबम असोसिएशनचे अध्यक्ष आणि ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे होते. यावेळी शोतोकान कराटे डो असोसिएशनचे अध्यक्ष व प्रशिक्षक सुरेश जाधव, राष्ट्रीय मर्दानी युध्दकला गुरुकुल नाशिकचे परिश्रुत क्षीरसागर, कराटे प्रशिक्षक सरफराज सय्यद, डॉ. प्रशांत जाधव, पिंटू जाधव, भारती पाचारणे, भानुदास कापसे, पै. संदीप डोंगरे आणि संदीप उद्धार आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरास जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निमगाव वाघा येथे प्रारंभ झाला असून, विद्यार्थ्यांना कराटे, लाठी-काठी, तलवारबाजी, भाला, दांडपट्टा यांसारख्या शिवकालीन मर्दानी युद्धकला तसेच स्वसंरक्षणाच्या आधुनिक तंत्रांची शिकवण दिली जात आहे. या प्रसंगी पै. नाना डोंगरे यांना कविवर्य नारायण सुर्वे जन्मशताब्दी निमित्त मराठी साहित्य मंडळ (ठाणे) यांच्या वतीने राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, शिवकालीन मर्दानी खेळ हे आपल्या संस्कृतीचे मूळ आहेत. या युद्धकला फक्त युद्धासाठी नव्हे तर शिस्त, आत्मविश्वास आणि शौर्य जागविण्यासाठी उपयुक्त आहेत. आजच्या युगात स्वसंरक्षण हा प्रत्येक विद्यार्थी आणि विशेषतः मुलींसाठी आवश्यक विषय झाला आहे. अशा प्रशिक्षण शिबिरांमुळे विद्यार्थी शारीरिकदृष्ट्या सबळ होतात आणि मानसिकदृष्ट्या सक्षम बनत असल्याचे त्यांनी सांगितले.

सरपंच उज्वलाताई कापसे म्हणाल्या की, आपल्या मुला-मुलींनी आधुनिक शिक्षणासोबतच स्वसंरक्षणाच्या कलाही आत्मसात केल्या पाहिजेत. कराटे आणि मर्दानी खेळ यांचा संगम म्हणजे आत्मविश्वास आणि साहसाचे प्रतीक आहे. या शिबिरातून विद्यार्थ्यांमध्ये अनुशासन, आदरभाव, देशप्रेम आणि परिश्रमाची सवय रुजेल. ग्रामपंचायतीच्या वतीने अशा उपक्रमांना नेहमीच पाठबळ दिले जाणार असल्याचे स्पष्ट केले. सुरेश जाधव यांनी हा उपक्रम केवळ स्वसंरक्षणापुरता मर्यादित नसून, “संस्कार, साहस आणि स्वाभिमान” यांचा वारसा पुढील पिढीकडे पोहोचविणारा ठरत असल्याचे सांगितले.

या प्रशिक्षण शिबिरात शेकडो विद्यार्थी सहभागी झाले असून, त्यांना प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष सराव करत आहे.

## एजेस फेडरल लाइफ इन्शुरन्स आणि मुथूट मायक्रोफिन यांच्यात भागीदारी

मुंबई : (समर्थ गांवकरी)

भारतातील खाजगी क्षेत्रातील आघाडीची आणि सर्वात वेगाने प्रगती करणारी जीवन विमा कंपनी एजेस फेडरल लाइफ इन्शुरन्स यांनी देशभरातील जास्तीत जास्त लोकांपर्यंत जीवन विमा सेवा पोहोचाव्यात यासाठी मुथूट मायक्रोफिन लिमिटेडसोबत महत्त्वाची वितरण भागीदारी जाहीर केली आहे. या भागीदारीचा उद्देश सूक्ष्म उद्योजक, लघु व मध्यम उद्योग (SMEs) तसेच विमा सेवा सहज उपलब्ध नसलेल्या ग्राहकांपर्यंत पोहोचणे आहे. या सहकार्यामुळे शहरी आणि ग्रामीण बाजारपेठेत वित्तीय सुरक्षा वाढीस लागेल आणि विमा सेवा अधिक सुलभ होतील. या धोरणात्मक सहकार्यामुळे एजेस फेडरल लाइफ इन्शुरन्स ग्रुपच्या जागतिक अनुभवाचा फायदा मुथूट मायक्रोफिन लिमिटेडच्या ग्राहकांना होणार असून, आता ग्राहकांना एकत्रितपणे उपलब्ध होणाऱ्या वित्तीय उत्पादनांद्वारे स्वतःचे आणि कुटुंबाचे संरक्षण करणे अधिक सोपे होईल. मुथूट मायक्रोफिनच्या सुमारे 78% शाखा मेट्रो शहरांबाहेर असल्याने, या सहकार्यामुळे देशातील जीवन विम्याचे प्रमाण वाढण्यास आणि संरक्षणातील मोठी तूट कमी करण्यास मदत होईल.

## राष्ट्रभक्ती, समाजन्याय महिला सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या राजनंदिनी आहेर यांना ‘भारत भूषण’ पुरस्काराचा बहुमान!”

नाशिक-कळवण : (समर्थ गांवकरी)

नाशिक जिल्ह्याचा अभिमान ठरलेल्या मा. सौ. राजनंदिनी संतोष आहेर यांना “राष्ट्रीय भारत भूषण आदर्श माता राष्ट्रमाता जिजाऊ कुशल नेतृत्व व सेवेतील उल्लेखनीय कार्य” या कार्यासाठी भारत भूषण पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. हा पुरस्कार साऊ ज्योती सामाजिक फाउंडेशन (महा. राज्य) स्माई आंबेडकर संस्था पुणे यांच्यावतीने १६ नोव्हेंबर २०२५ रोजी पुणे येथे भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे. समाजासाठी आयुष्य अर्पण — अन्यायाविरुद्ध लढणारी जिजाऊची कन्या राजनंदिनी




आहेर या गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील अन्याय, अत्याचार व विषमता यांच्या विरोधात रणांगणात उभ्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील “अन्याय अत्याचार निर्मूलन समितीच्या राज्याध्यक्ष” म्हणून त्या महिलांच्या हक्कासाठी, गरिबांच्या न्यायासाठी अहोरात्र लढत आहेत. अनेक वेळा त्यांनी समाजातील वंचित, पीडित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनापर्यंत आवाज पोहोचवला आहे.त्यांच्या या अखंड कार्यामुळे आज असंख्य महिला, तरुणी व वंचित कुटुंबे आत्मविश्वासाने उभे राहिले आहेत.

‘भारत भूषण’ — त्यांच्या अथक प्रयत्नांना सलाम राजनंदिनी आहेर यांच्या कार्याची दखल घेत राष्ट्रीय समितीने त्यांना हा मानाचा पुरस्कार बहाल करण्याचा निर्णय घेतला आहे.समाजसेवा, शैक्षणिक व न्याय्य कार्य क्षेत्रात असलेल्या त्यांच्या योगदानामुळे आज त्या नाशिक जिल्ह्यातीलच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणास्तंभ ठरल्या आहेत.त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक सामाजिक उपक्रम राबवले गेले — महिला अत्याचार प्रतिबंध मोहिमा, विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक मदत, गरजूंसाठी आरोग्य शिबिरे, आणि सामाजिक एकतेसाठी जनजागृती कार्यक्रम हे त्यांपैकी काही.

कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अभिमान, जनतेच्या मनात कृतज्ञता! राजनंदिनी मॅडम यांना पुरस्कार जाहीर झाल्याने कळवण, नाशिक व परिसरातील कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## चोरीच्या घटनाबाबत नागरिकांचे पोलिस अधिक्षकांना निवेदन

- पोलिस चौकी स्थापन करण्याची मागणी

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



बुरूडगाव रोड व विनायकनगर या विकसित परीसरात वारंवार होणाऱ्या चोरी,चैन स्नॅचिंग, घरफोडीच्या घटना वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे या संदर्भात प्रथम महापौर भगवान फुलसौंदर यांच्यासह नागरिकांनी पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन देउन गुन्हयांवर आळा घालावा आणि परीसरात स्वतंत्र पोलिस चौकी स्थापन करावी, अशी मागणी केली. यावेळी प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, ॲड. अवधूत फुलसौंदर, पांडुरंग धोत्रे, सुनिल कोल्हे आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की गेल्या तीन ते चार महिन्यांपासून बुरूडगाव रोड व विनायकनगर या परीसरात चैन स्नॅचिंग,चोऱ्या, घरफोडी घटना वाढल्याने परीसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे या परीसरात शहरातील अनेक व्यापारी,नोकरदार राहात असून सदर भागात गेल्या महिन्यात पांडुरंग धोत्रे, सुनिल कोल्हे, श्रीमती सरोजीनी कटारीया यांच्याकडे चोरी होउन मोठया प्रमाणात रोकड व ३५ तोळे सोने असा ऐवज चोरी झालेला आहे. ज्या घरातील नागरिक बाहेर गावी गेलेले असतात तेच घरे,बंगले फोडले जातात.एकाही चोरीचा अदयाप तपास लागलेला नसून नागरिक चिंताग्रस्त झालेले आहे.

## एथर एनर्जीचे आर्थिक वर्ष २६ च्या दुसऱ्या तिमाहीचे दमदार निकाल

पुणे : (समर्थ गांवकरी)

- सुधारित मार्जिन्ससह मार्केट शेअर 17.4% वर पोहोचला

एथर एनर्जी या भारताच्या आघाडीच्या इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादकाने आर्थिक वर्ष २६ वर्षातील दुसऱ्या तिमाहीत मार्केट शेअर, वाहनांची संख्या आणि आर्थिक स्थितीत तीव्र वाढीसह दमदार परफॉर्मन्स नोंदविला आहे. तिमाहीत झालेल्या या वृद्धीचे कारण आहे भौगोलिक विस्तार, वैविध्यपूर्ण उत्पादन पोर्टफोलियो आणि टेक्नॉलॉजीचा मजबूत पाया. या तिमाहीच्या अखेरीस कंपनीचा मार्केट शेअर 17.4%, वाहन विक्रीची संख्या 65,595 आणि ईबीआईटीडीए मार्जिनमध्ये सुमारे ११०० बीपीएस वार्षिक (10%) ची सुधारणा झाली आहे. यामधून संचालनाची सशक्त अंमलबजावणी आणि विकासाची स्थिर गती अधोरेखित होते. सप्टेंबर 2025 रोजी समाप्त झालेल्या तिमाहीत एथर एनर्जीने एकूण 940.7 कोटी रु. चे उत्पन्न नोंदविले आहे.

# मळगंगा मातेच्या आशिर्वादाने विकास कामांची गंगोत्री

**नामदार राधाकृष्ण विखे पाटील**

निघोज : (समर्थ गांवकरी)



कुकडी डावा कालवा पाटपाण्याला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होणे ही राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीची कृपा व आशीर्वाद असून विकासाची गंगोत्री अशीच सुरू राहणार असल्याची माहिती राज्याचे जलसंधारण मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे. निघोज येथील कुकडी डावा कालव्याच्या पाटाचे अस्तरीकरण भुमिपूजन समारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला. प्रारंभी या वेळी त्यांनी राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचे दर्शन घेतले व त्यानंतर झालेल्या भुमिपुजन व शेतकरी मेळाव्यास उपस्थित राहीले . यावेळी माजी मंत्री बबनराव पाचपुते, माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील, आमदार शरद सोनवणे, आमदार काशिनाथ दाते सर, भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, भाजपचे युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष पंकज कारखिले आदी उपस्थित होते. यावेळी मळगंगा देवीचे पुजारी विकास गायखे यांनी श्रीफळ देऊन नामदार विखे पाटील व मान्यवरांचे स्वागत केले. तसेच गायखे कुटुंबातील महिला सदस्यांनी या मान्यवरांचे औंशन केले. नामदार विखे पाटील म्हणाले पाटपाण्याने तालुक्यातील बहुतांश गावे समृद्ध झाली असून तसेच तालुक्यातील ४९ गावांसाठी सहा उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यात येणार आहेत. याचे आराखडा तयार करण्यासाठी दोन कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. अशाप्रकारे कुकडी डावा कालवा व पिंपळगाव जोगा धरण माध्यमातून तसेच उपसा जलसिंचन योजना माध्यमातून जवळपास तालुक्यातील शंभर गावांचा पाण्याचा कायमस्वरूपी प्रश्न सोडविण्यासाठी महायुतीसरकार प्रयत्नशील आहे. आमदार शरद सोनवणे यावेळी म्हणाले मळगंगा माता हे जागृत देवस्थान आहे. दरवर्षी यात्रेसाठी हजारो भावीक जुन्नर तालुक्यातून येत असतात. पिंपळवंडी हे माझे गाव असून त्याठिकाणी सुद्धा मळगंगा देवीचे मंदिर आहे. या यात्रेसाठी कुकडी डावा कालवा असो किंवा नदीला पाणी सुटले पाहिजे ही भावीकांची मागणी असते आणी ती पुर्ण करण्याचे काम महायुती सरकार करीत असते. नामदार विखे पाटील यांनी या पाटपाण्याच्या अस्तरीकरण होण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला ही मळगंगा मातेची कृपा व आशीर्वाद असल्याची भावना आमदार सोनवणे यांनी व्यक्त केली आहे. आमदार काशिनाथ दाते सर यांनीही नामदार विखे पाटील यांच्या या निर्णयामुळे हजारो शेतकऱ्यांना याचा फायदा होणार असून पारनेर तालुक्यातील सर्वाधिक गावांची शेतीच्या व पाण्याची टंचाई दूर होणार असून नामदार विखे पाटील व माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील हे दुरदृष्टी ठेऊन निर्णय घेत असल्याने पारनेर तालुक्यातील बहुसंख्य गावांचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार असल्याची माहिती दिली. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यावेळी म्हणाले पारनेर तालुका विकसीत करण्यासाठी नामदार विखे पाटील कुटुंबाचे फार मोठे योगदान असून माजी खासदार बाळासाहेब विखे पाटील, नामदार राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील,माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांनी जवळपास पन्नास वर्षात कोट्यवधी रुपयांची विकासकामे मार्गी लावली असून सहकार, धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रात विखे कुटुंबाचे पारनेर तालुक्यासाठी सर्वाधिक योगदान असल्याचे प्रतिपादन वराळ पाटील यांनी व्यक्त केले आहे.

आमदार काशिनाथ दाते सर यांच्या कार्यकाळात एडगाव धरण ते राळेगण थेरपाळ पर्यंत पाटपाण्याच्या अस्तरीकरण होण्यासाठी जवळपास शंभर कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला ही मळगंगा मातेची कृपा आहे. याबाबत आमदार दाते सर फार नशीबवान आहेत. हे काम वीस वर्षात होणे आवश्यक होते. मात्र उशिरा होणार असले तरी चांगल्या दर्जाचे होणार आहे. यामुळे पाण्याचा झिरपा होणार नाही. तसेच पारनेर, श्रीगोंदा या तालुक्यांना पुर्ण क्षमतेने पाणी मिळेल अशी अपेक्षा माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी व्यक्त केली आहे. तसेच मळगंगा देवीच्या आशीर्वादाने विखे पाटील कुटुंबाचा नावलौकिक राज्यात तर आहेच मात्र देशातही वाढेल अशी मनोकामना पाचपुते यांनी व्यक्त केली आहे.

# नॉलेज रिॲल्टी ट्रस्टचे लिस्टिंगनंतर पहिल्या तिमाहीत दमदार निकाल

## ऑक्युपन्सीमध्ये 92 टक्क्यांपर्यंत वाढ, एनओआयमध्ये 20 टक्क्यांची वाढ; 6,900 दशलक्ष रुपयांचे पहिले वितरण

मुंबई : (समर्थ गांवकरी)

भारतातील सर्वात मोठी आणि भौगोलिकदृष्ट्या सर्वांत विविध ठिकाणी कार्यालये असलेली राईट कंपनी नॉलेज रिॲल्टी ट्रस्टने ३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या कालावधीसाठी तिमाही आणि सहामाही निकाल आज जाहीर केले. आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या सहामाहीत १८ लाख चौरस फूटाची दमदार लिजिंग दिली, यामध्ये सरासरी २९ टक्के स्प्रेडवर १२ लाख चौरस फुटाची नवीन लिजिंग आणि ६ लाख चौरस फुटाच्या रिन्यूवल्सचा समावेश आहे. लिजिंगच्या दमदार गतीमुळे, पोर्टफोलिओ ऑक्युपन्सी वार्षिक ३४० बीपीएसने वाढून ९२ टक्के झाली. मुख्य बाजारपेठांना बाजारपेठेच्या बळकट मूलभूत तत्त्वांचा लाभ मिळतो (हैदराबाद ९९ टक्के व्यापलेले, वार्षिक वाढ १५० बीपीएस; मुंबई ८८ टक्के व्यापलेले, वार्षिक वाढ ५७० बीपीएस आणि बेंगळुरू ८८ टक्के व्यापलेले, वार्षिक वाढ ४१० बीपीएस). आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या सहामाहीत लिजिंग क्रियाकलापांमध्ये जीसीसी आणि देशांतर्गत कंपन्यांचा वाटा सुमारे ७० टक्के होता.· एम्बेडेड वाढीवर धोरणात्मक लक्ष केंद्रित करून, पहिल्या सहामाहीत ९० टक्यांपेक्षा जास्त लीजिंगवर वार्षिक भाडेवाढ साध्य. आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या सहामाहीत नेट ऑपरेटिंग उत्पन्नात (एनओआय) २० टक्के वार्षिक वाढ होऊन ते १९,५४४ दशलक्ष रुपये झाले, एनओआय मार्जिन विक्रमी ८९ टक्क्यांवर पोहोचले. आर्थिक वर्ष २०२६ च्या दुसऱ्या तिमाहीत महसूल ११,२३८ दशलक्ष रुपये होता आणि एनओआय ९,८८१ दशलक्ष रुपये होता. ७.२ टक्के च्या स्पर्धात्मक कूपनवर १६,००० दशलक्ष रुपये एएए रेटेड सूचीबद्ध नॉन-कन्व्हर्टेबल डिबेंचरची उभारणी. कर्ज पुनर्वित्त, व्याजदर कपात आणि कमी किमतीच्या एनसीडीमुळे दरसाल व्याजदराचा खर्च ७.४ टक्के झाला; १२० बीपीएसची वार्षिक बचत.१८ टक्के च्या कमी एलटीव्हीमुळे वाढीसाठी लक्षणीय वाव उपलब्ध. ६,९०० दशलक्ष रुपये किंवा प्रति युनिट १.५६ रुपयांचे पहिले वितरण जाहीर.



पुणे : लोयोला फुटबॉल कप २०२५ स्पर्धेमध्ये आठव्या दिवशी विद्या व्हॅलीने सेंट झेवियर्सवर ८-० असा मोठ्या फरकाने विजय मिळवत फॉर्म राखला. पाषाण येथील लोयोला एच.एस. मैदानावर टाटा ऑटोकॉम्पच्या प्रायोजकत्वाखाली सुरू असलेल्या स्पर्धेत मंगळवारी १२ वर्षांखालील गटात विद्या व्हॅलीने आदित्य द्विवेदी याच्या (३', १०', २५) तीन गोलच्या कामगिरीच्या मदतीने सेंट झेवियर्सला ८-० असे हरवले. आहान बैस (५ मिनिटांनी) आणि आकांक्ष ओझा (७ मिनिटांनी, १७ मिनिटांनी) आणि मल्हार देशमुख (३२ मिनिटांनी, ३९ मिनिटांनी) यांची त्याला चांगली साथ लाभली.

## थोडक्यात बातम्या...



### सरचिटणीस श्री. शशांक रावसाहेब यांचे बेमुदत उपोषण सुरू!

मुंबई (स. गांवकरी) : बेस्ट कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेस्ट वर्कर्स युनियनचे सन्माननीय सरचिटणीस श्री. शशांक रावसाहेब यांनी दि. १० नोव्हेंबर २०२५ पासून कॅनडियन ब्रिज, मुंबई येथे बेमुदत उपोषणास सुरुवात केली आहे. कामगारांच्या हितासाठी लढा देत असताना, श्री. रावसाहेब यांनी खालील प्रमुख मागण्या शासनासमोर मांडल्या आहेत —1. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युएटीची रक्कम एकरकमी देण्यात यावी. 2. वेतन करारानुसार कामगारांना योग्य ती वेतनवाढ लागू करण्यात यावी. 3. बेस्ट मालकीच्या ३३३७ बस गाड्यांचा ताफा कायम ठेवावा किंवा नवीन गाड्या खरेदी कराव्यात. 4. कंत्राटी कर्मचाऱ्यांना समान कामासाठी समान वेतन देण्यात यावे. या सर्व मागण्या न्याय्य असून कामगारांच्या हितासाठी आहेत, असे श्री. रावसाहेब यांनी स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, “जोपर्यंत या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत हे उपोषण सुरूच राहील.” या उपोषणास मुंबईतील विविध सामाजिक संस्था, संघटना, बेस्ट कामगार तसेच मुंबईकर नागरिकांकडून मोठा पाठिंबा मिळत आहे. बेस्ट वर्कर्स युनियनच्या या आंदोलनामुळे मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरही परिणाम होऊ शकतो, मात्र कामगारांच्या हक्कांसाठी रावसाहेब यांनी उचललेले हे पाऊल लढाऊ आणि प्रेरणादायी ठरत आहे.

### फॉग्सीतर्फे गर्भधारणापूर्व आरोग्यावर विशेष संपूर्णा या सार्वजनिक मंचाचे आयोजन

पुणे (स. गांवकरी) : द फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँन्ड गायनेकोलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (फॉग्सी) तर्फे संघटनेच्या संपूर्णा पब्लिक फोरम उपक्रमा अंतर्गत गर्भधारणापूर्व आरोग्यावर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.हा कार्यक्रम पुणे ऑब्स्टेट्रिक अँन्ड गायनेकोलॉजिकल सोसायटी (पीओजीएस) च्या सहयोगाने संपन्न होत आहे. फॉग्सीच्या राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.सुनिता तांदुळवाडकर यांच्या नेतृत्वाखाली गुरूवार,13 नोव्हेंबर 2025 रोजी आयएमए हॉल, टिळक रोड येथे दुपारी 2 ते सायंकाळी 5 दरम्यान हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून प्रसिध्द अभिनेत्री मृण्मयी देशपांडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असतील.14 ते 16 नोव्हेंबर 2025 दरम्यान जे.डब्ल्यू.मॅरिएट येथे फॉग्सी प्रेसिडेंशियल कॉन्फरन्स (अध्यक्षीय परिषद) "स्टार संपूर्णा " याचाच हा कार्यक्रम एक पूर्व भाग आहे.

# पारनेर नगराध्यक्षपदाच्या निवडी दरम्यान दहशत व दडपशाही

- नगरसेवक अशोक चेडे यांचा आरोप
- चुकीचे राजकारण खपवून घेणार नाही
- पारनेर येथे महायुतीची पत्रकार परिषद



पारनेर : (समर्थ गांवकरी)

पारनेर नगराध्यक्ष पदाच्या निवडीत महायुती व महाविकास आघाडी मध्ये चांगलाच कलगीतुरा रंगला आहे. महायुतीनेच नगराध्यक्ष पदाच्या निवड प्रक्रियेमध्ये घोडेबाजार केल्याच्या आरोप झाल्यानंतर महायुतीच्या वतीने पारनेर शहरात पत्रकार परिषद घेत महाविकास आघाडीने कशा पद्धतीने दडपशाही व दहशत वापरत नगराध्यक्ष पद मिळवले हे सांगितले आहे.

पारनेर येथे महायुतीच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली यावेळी भाजपचे नगरसेवक अशोक चेडे म्हणाले की पारनेर नगरपंचायतच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडीत दबाव निर्माण करत व ११ नगरसेवकांना नजर कैदेत ठेवून लोकशाहीचा गळा घोटण्याचा नगराध्यक्ष पदाच्या निवडीत महाविकास आघाडीने प्रयत्न केला आहे. खासदार निलेश लंके हे चुकीच्या पद्धतीने राजकारण करत असून दहशत आणि दडपशाही मार्गाने नगराध्यक्ष निवडीमध्ये व बाहेरचे लोक पाठवून दबाव गट निर्माण करून त्यांनी नगराध्यक्ष पदाची निवडणूक जिंकली आहे. माजी नगराध्यक्ष नितीन अडसूळ यांनीच महायुतीच्या उमेदवाराला नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज भरण्यास लावला होता परंतु ऐनवेळी त्यांच्यावर दबाव आल्यामुळे त्यांनी काढता पाय घेतला असल्याचे दिसून येते. चुकीच्या पद्धतीने पारनेर नगरपंचायत मध्ये राजकारण सुरू असून विकास कामांना प्राधान्य न देता दबाव तंत्राचेच राजकारण सुरू आहे. महायुतीने घोडेबाजार केला हा आरोप अतिशय चुकीचा आहे यामध्ये कोणत्याही प्रकारचे तथ्य नाही. चार ते पाच नगरसेवक महायुतीसोबत येण्यास तयार होते परंतु महाविकास आघाडीतील वरिष्ठांनी त्यांच्यावर दबाव आणल्यामुळेच त्यांनी माघार घेतली आहे अनेक लोक त्यांना निवडणूक मध्ये सहकार्य करण्यास तयार नव्हते. असे स्पष्ट मतच नगरसेवक अशोक चेडे माजी नगराध्यक्ष विजुभाऊ औटी, नगरसेवक पै. युवराज पठारे, नवनाथ सोबले, चंद्रकांत चेडे, देवराम ठुबे, नंदू औटी, कांतीलाल ठाणगे यांनी पत्रकार परिषद घेऊन व्यक्त केले आहे.

पारनेर नगरपंचायतच्या नगराध्यक्षपदी खासदार निलेश लंके गटाच्या नगरसेविका डॉ. विद्या कावरे यांची नगराध्यक्षपदी निवड झाली या निवडीनंतर पारनेर शहरातील राजकारण चांगलेच तापले असून महायुतीच्या वतीने निवड प्रक्रियेवर आक्षेप घेण्यात आला आहे.

सध्या पारनेर शहराच्या राजकारणावरून सुरू असलेले आरोप प्रत्यारोप यामुळे पारनेर शहराचे राजकारण वेगळ्या दिशेने जात आहे.

पारनेर शहरांमध्ये चुकीच्या पद्धतीने राजकारण सुरू आहे विकास कामांच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याची भूमिका ही महायुतीची आहे चुकीच्या पद्धतीने आरोप करून महाविकास आघाडी स्वतःच्या चुकांवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करत आहे.

**- युवराज पठारे (नगरसेवक, पारनेर)**

पारनेर नगरपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्थेचाच भाग आहे त्यामुळे हंगा किंवा राळेगणसिद्धी वरून या गावचे कारभार कोणी पाहत असेल तर त्यांना आम्ही यापुढील काळात धडा शिकवू आमच्या गावात त्यांनी लक्ष घालण्याचा प्रयत्न करू नये पारनेरवासीय यासाठी सक्षम आहेत.

**- चंद्रकांत चेडे (पारनेर)**

मी राष्ट्रवादी घड्याळाचा नगरसेवक आहे. त्यामुळे महाविकास आघाडीने मला बजाविलेला व्हीप मान्यच होऊ शकत नाही, मी त्यांच्या गटात बसतच नाही. मी महायुती सोबतच आहे. नगराध्यक्ष पदाच्या निवडीत पारनेर शहरात दहशत निर्माण करण्यात आली व लोकशाहीला आव्हान देण्यात आले. हे राजकारण चुकीचे आहे.

**- विजुभाऊ औटी (माजी नगराध्यक्ष, पारनेर)**

# ‘आयथ्राइव्ह सिम्पोजियम २०२५’ परिषदेचे पुण्यात आयोजन

पुणे : (समर्थ गांवकरी)




‘आयथ्राइव्ह’ तर्फे ‘सिम्पोजियम २०२५’ या आगळ्यावेगळ्या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विज्ञान, निसर्ग आणि चेतना यांच्या अद्भुत संगमातून आधुनिक आरोग्यसेवेची नवी व्याख्या साकार करणारा हा आगळा-वेगळा उपक्रम ठरणार आहे.‘आरोग्यसेवेच्या भविष्याचा नव्याने विचार’ या अनोख्या थीमअंतर्गत डॉक्टर, वैज्ञानिक, संशोधक आणि विचारवंत आदी या परिषदेत सहभागी होऊन पारंपरिक आरोग्यव्यवस्थांना आव्हान देऊन नव्या उपचारपद्धती आणि समग्र दृष्टिकोनाचा वेध घेणार आहेत. हा कार्यक्रम पारंपरिक वैद्यकीय चर्चेपलीकडे जाऊन भविष्यातील आरोग्यजगताला आकार देणाऱ्या महत्त्वाच्या विषयांवर लक्ष केंद्रित करणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित वैद्यकीय नवकल्पना, लिम्फॅटिक आरोग्य, माइटोकॉन्ड्रियल पोषण, उपचारातील चेतनेची भूमिका, आधुनिक विज्ञानाद्वारे प्रमाणित प्राचीन ज्ञान आणि भारतासाठी सुसंगत आरोग्यमानके यांसारख्या विषयांवर परिषदेत सखोल चर्चा होणार आहे. ‘सिम्पोजियम २०२५’ हा उपक्रम कार्यक्रम येत्या शनिवारी (१५ नोव्हेंबर २०२५) ‘सिम्बायोसिस इंटरनॅशनल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर’, लवळे, पुणे येथे होणार आहे.

# जवळा-कान्हूर पठार गटात मशाल धगधगणार

- डॉ. श्रीकांत आण्णा पठारे यांना उमेदवारी निश्चित!



पारनेर : (समर्थ गांवकरी)

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जवळा-कान्हूर पठार गटातून जिल्हा परिषद निवडणुकीसाठी डॉ. श्रीकांत आण्णा पठारे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मातोश्रीवरून थेट आदेश आल्यानंतर ही उमेदवारी फिक्स झाल्याचे पक्षातील विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. मशाल चिन्हावर डॉ. पठारे विजयाचा झेंडा फडकावतील, असा विश्वास शिवसैनिकांनी व्यक्त केला आहे.

डॉ. श्रीकांत पठारे हे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पारनेर तालुकाप्रमुख असून पारनेर तालुक्यातील दबंग नेते म्हणून ओळखले जातात. यापूर्वी त्यांनी शिवसेना (उबाठा)च्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नांसाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. पक्षातील एकनिष्ठ नेते म्हणून त्यांची ख्याती असून, मातोश्रीच्या विश्वासाचे प्रतिक म्हणून त्यांना ही संधी देण्यात आली आहे. “मातोश्रीचा आदेश आला... जवळा-कान्हूर पठार गटात मशाल पेटणार!” अशा घोषवाक्यांसह सोशल मीडियावर शिवसैनिकांनी जल्लोष सुरू केला आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही उमेदवारी पक्षासाठी मोठा दिलासा मानला जातो. डॉ. पठारे यांच्या प्रचाराला पक्षाचे प्रमुख नेते आणि मातोश्रीतून पाठबळ मिळणार असल्याचे समजते. येत्या काही दिवसांत प्रचाराला वेग येईल आणि मशाल चिन्हाची ताकद दाखवली जाईल, असा दावा शिवसैनिक करत आहेत.

डॉ. श्रीकांत आण्णा पठारे यांच्या विजयासाठी शिवसैनिक, मित्रपरिवार, गटातील आणि तालुक्यातील सर्व जनता उत्साहित असून, जवळा-कान्हूर पठार गटात मशाल धगधगण्याची खात्री व्यक्त करत आहेत.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते तथा माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची संपूर्ण जबाबदारी डॉ. श्रीकांत अण्णा पठारे यांच्याकडे सोपवली असुन उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे की, “पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीची सर्व जबाबदारी डॉक्टर श्रीकांत अण्णा पठारे यांची राहील. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी डॉक्टर श्रीकांत पठारे यांना सर्व ताकतीने सहकार्य करावे.”

# पारनेरचे माफिया राज रोखण्यासाठी निवडणूकीत महायुतीला पाठबळ द्या

## नामदार राधाकृष्ण विखे पाटील

निघोज : (समर्थ गांवकरी)




रेडबुलचा वापर करुण पारनेरचा माफियाराज माध्यमातून सर्वसामान्य जनतेला दादागीरीला सामोरे जावे लागत आहे. विकासप्रक्रिया खंडीत करुण ठेकेदारीचा व्यवसाय करीत दादागीरी सुरु असून याचा बिमोड करण्यासाठी महायुतीला उद्याच्या निवडणुकीत जनतेने पाठबळ देण्याचे आवाहन राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले आहे. पारनेर तालुक्यातील निघोज येथे कुकडी डावा कालवा पाटाचे अस्तरीकरण भुमिपूजन कार्यक्रम त्यांच्या हस्ते करण्यात आला. या कामासाठी ८३ कोटीचा निधी नामदार विखे पाटील व माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून उपलब्ध झाला आहे. या कार्यक्रमास माजी मंत्री बबनराव पाचपुते, माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील, आमदार शरद सोनवणे, आमदार काशिनाथ दाते सर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, जिल्हा उपाध्यक्ष आर एम कापसे सर, भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, पारनेरचे माजी नगराध्यक्ष विजय औटी, माजी सभापती गणेश शेळके, सुप्याचे माजी सरपंच दत्ता नाना पवार, डॉ.प्रदिप दाते, डॉ. भाऊसाहेब खिलारी, भास्करराव उचाळे, भाजपच्या महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष सोनाली सालके पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य राजाराम एरंडे,माजी पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर, ज्येष्ठ नेते दादाभाऊ वारे, अश्वीनी थोरात, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, भाजपचे युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकज कारखिले, सरपंच चित्राताई वराळ पाटील, उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊलीशेठ वरखडे , तंटामुक्ती समिती अध्यक्ष मंगेश लाळगे, माजी ग्रामपंचायत सदस्य भिमराव लामखडे, माजी ग्रामपंचायत सदस्य भास्करराव वराळ पाटील, अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार, मुस्लिम समाजाचे शहराध्यक्ष साजीदभाई तांबोळी , बब्बुशेठ मोमीन, ग्रामपंचायत सदस्या रुपालीताई गायखे, ग्रामपंचायत सदस्य शबणूर इनामदार, माजी ग्रामपंचायत सदस्या सुमनताई कवाद, माजी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय घोगरे, आदी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नामदार विखे पाटील म्हणाले जाणत्या राजाने अनेक वेळा पारनेर दौरा केला मात्र त्यांना पाण्याचा प्रश्न सोडवीता आला नाही उलट अहिल्यानगर जिल्ह्यातील पाणी अडवीण्याचे पाप त्यांनी केले आहे. मात्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी सातत्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील विकासाला पाठबळ देत सातत्याने जनतेच्या हितासाठी विकासाभिमुख निर्णय घेतले आहेत. माजी मंत्री बबनराव पाचपुते, आमदार शरद सोनवणे, आमदार काशिनाथ दाते सर यांनी जिल्ह्यातील जनतेला पाणी मिळण्यासाठी सातत्याने सकारात्मक भुमिका घेतली असून गेली चाळीस वर्षात प्रथमच पाटपाण्याच्या अस्तरीकरण होण्यासाठी मोठा निधी उपलब्ध झाला असून हे काम वर्षभरात पुर्ण होणार आहे. हे काम प्रलंबित राहील्याने पाणी झिरपत होते. पाणी सुटल्यानंतर पाचशे क्युसेक्स पाणी जाग्यावर वाया जात होते. हे काम पुर्ण झाल्यानंतर जवळपास पाचशे क्युसेक्स विसर्ग वाढणार आहे. याचा फायदा अहिल्यानगर जिल्ह्यातील जनतेला मोठ्या प्रमाणात होणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले. पारनेरची कामधेनू पारनेर साखर कारखाना माजी खासदार बाळासाहेब विखे पाटील यांनी सुरु केला. तो कारखाना मोठा होण्यासाठी माजी आमदार बाळासाहेब भगत, माजी आमदार नंदकुमार झावरे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रयत्न केले. मात्र तोच कारखाना विकण्याचे पाप येथील काही पुढाऱ्यांनी केले. कामगार शेतकरी यांना आर्थिक पाठबळ देणारा हा कारखाना पुन्हा सहकारी तत्त्वावर सुरू होईल यासाठी आपण प्रयत्नशील असून शेतकरी हिताचे निर्णय सुरुच राहणार आहेत. कांद्याला भाव मिळण्यासाठी राज्य व केंद्र सरकार प्रयत्नशील असून लवकरच कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेणार असल्याचे नामदार विखे पाटील यांनी सांगितले. माजी मंत्री बबनराव पाचपुते, आमदार शरद सोनवणे, आमदार काशिनाथ दाते सर यांनी नामदार राधाकृष्ण विखे पाटील,माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांनी केलेला पाठपुरावा व त्यांनी हा मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल विखे पिता पुत्रांना धन्यवाद व्यक्त करीत आभार मानले. सहकार क्रांती, शैक्षणिक क्रांती, वैद्यकीय क्रांती याचबरोबर विखे कुटुंबाने जलक्रांती केली असून पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांनी खऱ्या अर्थाने सहकाराच्या माध्यमातून राज्यातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे तेच काम नामदार विखे पाटील, माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील करीत असून महायुतीच्या सरकारने अतिशय जलद विकासकामे केली असून यापुढील कार्यकाळात महायुती शिवाय जनतेला पर्याय नाही एवढ्या मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले. यावेळी निघोज ग्रूप ग्रामपंचायत, निघोज ग्रामस्थ, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन , अल्पसंख्याक समाज यांच्या वतीने विखे पाटील व मान्यवरांचा सचिन पाटील वराळ व राळेगण थेरपाळ लोकनियुक्त सरपंच पंकज कारखिले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास पाटबंधारे तसेच जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे पदाधिकारी व सदस्य तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ तसेच अंगणवाडी सेविका व महिला बचत गटाच्या पदाधिकारी व सदस्यां मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लहू साबळे यांनी केले शेवटी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी आभार मानले. जाणता राजा म्हणून शरद पवार व रेडबुलचे आपल्या भाषणात वारंवार उल्लेख करीत खासदार नीलेश लंके यांचे नाव न घेता नामदार विखे पाटील यांनी जोरदार टिका केली. आजपर्यंत पाणी आडवण्याचे काम पुण्याचे पुढारी करीत होते.

मात्र यामध्ये आमदार शरद सोनवणे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यासाठी सकारात्मक भुमिका घेऊन एक प्रकारे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत करण्याची भुमिका घेतली आहे. यापुढे पुण्याच्या पुढाऱ्यांनी कितीही पाण्यासाठी अडवाअडवी केली तरी महायुतीचे सरकार पाटपाण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देणार असल्याने महायुतीचे सरकारच जनतेच्या हिताचे निर्णय घेणारे असल्याचे नामदार विखे पाटील यांनी सांगताच उपस्थीतांनी टाळ्या वाजवून त्यांच्या भाषनाला दाद दिली.